# बदलांचा वारा

महाराष्ट्रातील सामाजिक-नागरी संघटनांच्या प्रतिनिधींनी
तयार केलेल्या कथांचा संग्रह



विकास संवाद आणि आरआरए नेटवर्क

**प्रिय साथी,**

नमस्कार!

ही पुस्तिका तुमच्या हाती देताना आनंद होत आहे. यात अशा लोकांच्या आणि संस्थांच्या प्रेरणादायी कथा आहेत, ज्यांनी शेती, उपजीविका आणि अन्नसुरक्षेच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण काम केले आहे. संकटांशी सामना करत त्यांनी आपली आणि आपल्या समुहाची स्वप्ने साकार केली. त्यांचे अनुभव तुम्हालाही प्रेरणादायी वाटतील. विशेष म्हणजे, हा महत्त्वपूर्ण बदल घडवणाऱ्या हातांनीच या कथा लिहिल्या आहेत.

विकास संवादने महाराष्ट्रातल्या RRA नेटवर्कशी संबंधित सामाजिक संस्थांच्या सहकार्याने दोन स्टोरी टेलिंग कार्यशाळा घेतल्या. यातील एक कार्यशाळा यवतमाळमध्ये ग्रामीण समस्या मुक्ति ट्रस्टसोबत पार पडली. तीन दिवस सर्वांनी संवाद साधणे, लिहिणे, शिकणे आणि शिकवणे या प्रक्रियेचा अनुभव घेतला. त्यातून मिळालेल्या शिकवणुकीचं एक महत्त्वाचं फलित म्हणजे ही पुस्तिका आहे.

या कथा वाचताना तुम्हालाही वाटेल – "जर त्यांनी केलं आहे, तर आपणही करू शकतो!" या प्रयत्नांतून सामाजिक संस्थांच्या कार्याची ओळख अधिक लोकांपर्यंत पोहोचावी, हीच आमची इच्छा आहे. संघर्ष आणि चढउताराच्या अनुभवातून यशाच्या पोहोचण्याच्या या कथा कार्यकर्त्यांच्या नैसर्गिक शैलीत आम्ही तुमच्यासमोर ठेवत आहोत.

तुमच्या प्रतिक्रिया आम्हाला अवश्य कळवा.

सप्रेम,

**टीम विकास संवाद आणि RRA नेटवर्क**

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| 1. | मंजूचा निर्धार: आधी शिक्षण, मग लग्न | राम पवार |
| 2. | मनातल्या इच्छांना मिळाली 'उमेद'ची साथ | ज्योती पगार |
| 3. | रोजगार हमीतून बेरोजगारीवर मात करणारे देवाडा | शंकर भरडे |
| 4. | समस्याग्रस्त महिलांची हक्काची सखी सुनिता | कमलाकर गंगाराम चिकटे |
| 5. | ऊसतोडीमुळे शिक्षणाची आबाळ | जीवन राठोड |
| 6. | वतनी जमिनींवर सामुदायिक शेतीतून परिवर्तन करणारे हातीद | नंदू मोरे |
| 7. | शिक्षणाची गाडी पटरीवर आणणारे डोंगरगाव स्टेशन | सुरेश बाबर |
| 8. | सामाजिक कार्यकर्त्यालाही ऊर्जेची गरज असते | पंकज शिंदे |
| 9. | जल व मृदा संधारणाच्या कामातून जलसमृद्ध झालेले तुपेवाडी | पुष्कराज तायडे |
| 10. | शून्यातून शिखराकडे वाटचाल करणारी कोसी ग्रामसभा | मिनाक्षी नाकाडे |
| 11. | दुष्काळमुक्त आणि जलयुक्त काठेवाडी | वसंत रावणगावकर |
| 12. | जपले गावरान मिरचीचे वाण, राखली गावाची शान! | कृष्णा अंभूरे |
| 13. | चारोळी विक्रीचा उद्योग यशस्वी करणारे वागदरा | प्रफुल्ल उईके |
| 14. | दानापूरचे हरित परिवर्तन | हिंमत शेलकी |
| 15. | बालहक्कांच्या संरक्षणासाठी सक्रीय संवेदनशील गावकरी आणि अधिकारी | निलेश गाडगे |
| 16. | जलसमृद्धीमधून धनसमृद्धीकडे | मोहन जाधव |
| 17. | सामाजिक काम म्हणजे निरंतर शिकण्याची संधी | प्रणाली पेटकर |
| 18. | संघर्षातून भरारी | दुलन मरापे |




| | | |
|---|---|---|
| 19. | उमरगाव अंजानीचा एकतेचा प्रवास | चंदन मलांडे |
| 20. | एकल महिलांची एकजूट | अंतरा ठोंबरे |
| 21. | मजुरांचे पलायन रोखणारी रोजगार हमी | पंकज किनाके |
| 22. | समूह बांधणी महिलांची, पाऊलवाट आत्मनिर्भरतेची | अर्चना तुरे |
| 23. | नैसर्गिक शेतीची कास धरणारा देविदास | आकाश मेश्राम |
| 24. | आपल्या नृत्यकौशल्यातून नवी झेप घेणाऱ्या पारलिंगी संजयची गोष्ट | अंकज अबाले |
| 25. | आर्थिक स्वावलंबनातून आत्मविश्वास उंचावला | सुनिता सातपुते |
| 26. | चूल आणि मूल यापलिकडे स्वत:ची ओळख घडवणारी सक्षम सुवर्णा | प्रिया ज. लक्षणे |
| 27. | समाजाच्या सहकार्यानेच बालविवाह-मुक्त भारत शक्य! | संकेत नामपेल्लीवार |
| 28. | भीती, संकोच दूर करत, उमेद देणारा एक प्रवास | प्रदीप चंद्रभान शेंडे |
| 29. | शेतीला दिली बकरीपालनाची साथ | रावभान शंकर मडावी |
| 30. | शकुंतलाताईंची नैसर्गिक शेती | समाधान कव्हर |
| 31. | बाई झाली सरपंच, सुधारला गावाचा प्रपंच | पूजा विनोद कोवे |
| 32. | गोष्ट सामूहिक वनहक्कांची, आदिवासींच्या एकजुटीची | राहुल चिचघाटे |
| 33. | संवेदनशीलतेने केलेला नशामुक्तीचा प्रयत्न | भक्ती पजगाडे |
| 34. | विषमुक्त जमीन, सत्वयुक्त अन्न | अनिल सेलुकार |
| 35. | नागलीचे पुनरुज्जीवन: पीक जुने, पद्धती नवी | संगिता जाधव |
| 36. | निकमवाडीच्या मेहनती गावकऱ्यांनी तयार केला रस्ता | संगिता जाधव |




# मंजूचा निर्धार: आधी शिक्षण, मग लग्न

राम पवार

त्या दिवशी मंजू मोठ्या उत्साहात उठली. आज तिचा बारावीचा निकाल होता. सकाळचा चहा घेत बोलणाऱ्या आई-पप्पांचं बोलणं तिच्या कानावर पडलं. "बस्स झालं आता लेकीचं शिक्षण! चांगला मुलगा चालून आलाय, ओळखीचा आहे, नात्यातला आहे..." आई पप्पांना सांगत होती. आता आपले बारावीनंतरचे बेत मनातच राहणार बहुतेक असं वाटून मंजू थोडी खट्टू झाली. निकाल चांगला लागणार याची तिला खात्री होती. तिला नर्सिंगचा डिप्लोमा करायचा होता. आई-पप्पांना हे सांगण्याचे धाडस होत नव्हते. काय करायचे, याचा विचार ती करत राहिली.

अपेक्षेप्रमाणे मंजू चांगल्या मार्कांनी पास झाली. पण त्याचा आनंद तिला वाटेना. आपले स्वप्न अपूर्णच राहणार की काय, या विचाराने ती अस्वस्थ होती.

रात्री जेवताना पुन्हा विषय निघाला. पप्पा म्हणाले, "मंजू, आपली गरिबी आहे. पुढचा खर्च झेपणार नाही. चांगले स्थळ चालून आलेय तुझ्यासाठी. परवा मुलगा बघायला येईल तुला...." मंजूच्या घशाखाली घास उतरेना.

काहीच न बोलता ती झोपायला गेली, पण झोपही लागेना. मंजू विचार करत राहिली. एकदम तिला मानवसेवा संस्थेची 2021 मध्ये झालेली बालहक्क परिषद आठवली आणि आशेचा किरण दिसला. उद्या सकाळीच संस्थेच्या राम पवारांना फोन करून बघूया, असा विचार करता करता तिचा डोळा लागला.

सकाळी पप्पांचा फोन घेऊन हिंमत करून मंजूने फोन लावला, "सर, मी चेरा गावची मंजुषा भालेराव बोलतेय. कालच बारावीचा निकाल लागला, मला 65 टक्के मार्क मिळालेत. मला पुढे शिकायचे आहे. पण आई वडील लग्न करणार म्हणतायत, परवा मुलगा बघायला येणार आहे...." तिने एका दमात सांगून टाकले. तो मुलगा घरी येण्याच्या आधी आईवडिलांशी बोलायचे असे ठरले.

ठरल्याप्रमाणे दुसऱ्याच दिवशी संस्थेचे प्रतिनिधी मुलाच्या घरी गेले. त्यांनी तिथले वास्तव पाहिलं. नंतर मंजूच्या आईवडिलांना भेटायला आले. लवकर लग्न केलं तर भविष्यातील संभाव्य अडचणी आणि डिप्लोमा पूर्ण झाला तर होणारी संभाव्य मदत या दोन्हीची चर्चा त्यांनी केली. शिक्षणाच्या खर्चासाठी संस्थेनं मदतीचा हात पुढे केला. अखेर 'मंजूला शिकू द्या' हे घरच्यांना समजवण्यात संस्थेला यश आले. सर्वात महत्त्वाचं म्हणजे मंजू खूष झाली. आता आपले शिक्षण पूर्ण होणार या कल्पनेने मंजूच्या आनंदाला

पारावार उरला नाही.

लातूर जिल्ह्यातल्या जळकोट येथील 'तिरुमला नर्सिंग स्कूल'मध्ये तिने प्रवेश घेतला. फी सोयीने भरण्याची विनंतीही मान्य झाली. राहण्याची व्यवस्था सरकारी वसतिगृहात झाली. मंजूची शिकण्याची जिद्द पाहून तिच्या धाकट्या बहिणीने, अंजूनेही, औषध तज्ञ अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. कोर्सची वर्षे बघता बघता संपली आणि जानेवारी 2024 मध्ये मंजूचा कोर्स पूर्ण झाला.

मंजू तर खूष होतीच. तिच्या प्रगतीमुळे तिचे आईवडील तिच्याहून जास्त खूष होते. परवाच त्यांचा संस्थेत फोन आला होता. "सर, मी उत्तम भालेराव बोलतोय. मंजू नर्स झाली!" त्यांनी आनंदानं सांगितले. आपली चूक कबूल करायलाही ते विसरले नाहीत. "तुम्ही भेटला नसतात तर आमच्या हातून मोठीच चूक झाली असती. पण आमचा बदललेला निर्णय बघून ज्या नातेवाईकांनी मंजूसाठी स्थळ आणले होते त्यांनीही त्यांच्या मुलीला लातूरला नर्सिंगला पाठवले. आम्हीदेखील तिन्ही मुलींची शिक्षण पूर्ण करणार." त्यांनी मोठ्या खुशीने सांगितले. "आता मला मंजूसाठी मुलगा शोधायची गरज नाही, चालून येतील आता!" त्यांनी अभिमानाने म्हटले.

आज मंजू जळकोटला खाजगी रुग्णालयात काम करते आहे. 'एकदा भेटून जा' अशी विनंती केल्याने संस्थेचे प्रतिनिधी गेले असता तिथल्या डॉक्टरांनी मंजूच्या कामाची पावती दिली. "शांत, प्रामाणिक आणि मेहनती मुलगी आहे," असं ते म्हणाले.

घरच्यांनी लग्नाचा घाट घातला होता, पण त्याला बगल देत मंजूने तिचे आयुष्य बदलले. घडवले. आजही घरामध्ये मंजूच्या लग्नाचा विषय निघतो. मात्र त्या चर्चेत तीही सामील असते. तिच्या संमतीशिवाय निर्णय होणार नाही याची तिला खात्री आहे.

**9764943131**

# मनातल्या इच्छांना मिळाली 'उमेद'ची साथ

ज्योती पगार

मी रेणुका लखीचंद चव्हाण. धुळे जिल्ह्यातलं पाडळदे हे माझं गाव. आपण काहीतरी काम करावं, संसाराला हातभार लावावा, आर्थिक परिस्थिती सुधारावी ही माझी खूप दिवसांपासूनची इच्छा होती. पण नेमकं काय करावं, हे सुचत नव्हतं. सांगणारही कोणी नव्हतं. मात्र, अशी एक संधी चालून आली आणि त्याचा योग्य वापर करत मी माझं आयुष्य माझ्या इच्छेप्रमाणं घडवलं, त्याचीच ही गोष्ट.

2005 मध्ये माझं लग्न झालं. सासरची परिस्थिती बेताची होती. आमचा वंजारी समाज, कष्टाळू पण मागासलेला. माझे मिस्टर ट्रॅक्टर चालवायचे. शेतीची कामं करायचे. पण शेती निसर्गावर अवलंबून असल्यानं कधी-कधी मोठं नुकसान सहन व्हायचं. ट्रॅक्टरच्या कामातूनही पुरेशी कमाई नव्हती. उधारीवरच घर चालवावं लागायचं. लग्नानंतर दोन मुलं झाली. त्यांना वाढवताना आर्थिक अडचणींना सामोरे जावं लागत होतं. त्यामुळे मी साड्यांवर पिको आणि फॉल लावणं, ब्लाऊज शिवणं अशी घरगुती कामं सुरू केली. घरखर्चाचं ओझं काहीसं हलकं झालं.

आधी मला बँक म्हणजे काय तेही माहिती नव्हतं. गावात बायकांनी बँकेत जाणं, आर्थिक व्यवहार करणं ऐकिवात नव्हतं. मात्र, 2019-20 मध्ये आमच्या गावात 'महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान' म्हणजेच 'उमेद'च्या अंतर्गत वर्धिनी फेरीचं आयोजन झालं. पाच वर्धिनीताई 15 दिवस गावात राहिल्या. त्यांनी महिलांसाठी स्वयंसहायता समूहाची महत्त्वाची भूमिका समजावून सांगितली. आमच्या गल्लीतल्या दहा महिलांनी मिळून बचत गट केला. 'ओम साई' असं नाव मला गटासाठी सुचलं, सगळ्यांनाच ते आवडलं.

समूहाच्या बैठकीत आम्हाला वेगवेगळ्या योजनांची माहिती मिळत गेली. आपला समूह केवळ बचतीपुरता न ठेवता उपजीविका कशी सुरू करावी, हे समजलं. मी माझ्या समूहातील महिलांना याबाबत जागरूक केलं. बचत सुरू झाली, बँक व्यवहार शिकायला मिळाले, आणि अंतर्गत व्यवहार सुरळीत सुरू झाले.

अधिकाऱ्यांच्या प्रेरणेतून व्यवसाय सुरू करण्याचा विचार आला. गावात, तालुक्यात, जिल्ह्यात विक्रीसाठी योग्य असा व्यवसाय निवडायचं ठरवलं. तयार खाद्यपदार्थांची मागणी लक्षात घेऊन महिलांनी पापड उद्योग सुरू केला. सुरुवातीला अडचणी आल्या, पण एकमेकांच्या मदतीने त्या सोडवल्या. व्यवसाय वाढू लागला. मागणी वाढल्याने मशीन घेऊन उत्पादन वाढवलं. आज आमच्या व्यवसायाला उद्योगाचं स्वरूप मिळालं आणि वार्षिक 14 ते 15 लाखांची विक्री होते. विविध प्रदर्शनांमध्ये आणि

ऑनलाइन विक्रीही सुरू आहे.

माझी शिकण्याची आवड लक्षात घेऊन कृषी विभागाकडून मला एका वेगळ्याच विषयाच्या प्रशिक्षणासाठी निवडलं. 'ड्रोन पायलट'चं प्रशिक्षण मी घेतलं. फक्त सात मिनिटांत एक एकर शेतात ड्रोनद्वारे फवारणी करता येते. संधी मिळतात, पण त्या स्वीकारण्याचं धाडस दाखवलं तरच यश मिळतं. हे मला अनुभवातून उमगलं

माझ्या प्रत्येक निर्णयात मला कुटुंबाची साथ आणि 'उमेद'चं पाठबळ मिळालं. आर्थिक सहाय्य मिळाल्याने व्यवसाय सुरू करता आला आणि समूहातील महिलांना कमी व्याजदराचं कर्ज उपलब्ध झालं. परिणामी गावातली सावकारशाही कमी झाली. 'उमेद' अभियानामुळे माझ्या संसाराला आणि आयुष्याला मदत तर झालीच, पण माझ्या इच्छांना नवे पंख लाभले आणि जीवनात परिवर्तन घडवता आले.

94250926321

# रोजगार हमीतून बेरोजगारीवर मात करणारे देवाडा

शंकर भरडे

देवाडा गावातील लोकांचे पारंपरिक जंगलावर आधारित व्यवसाय बंद झाल्यामुळे गावाच्या समस्या वाढू लागल्या. गावात केवळ चार-पाच लोकांकडे मोबाईल आहेत, पण नेटवर्क नसल्याने तलावाच्या पारीवर जाऊन फोन करावा लागतो. कच्च्या मुरुमाच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना घनदाट जंगल आणि वन्यजीवांची वर्दळ आहे, त्यामुळे वाघांची भीती कायम असते. गावात बससेवाही नाही. ही माहिती ऐकून मन सुन्न झालं आणि प्रत्यक्ष गावात जाऊन परिस्थिती जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण झाली.

मी माझ्या सहकारी माधवभाऊ आधार जिवतोडे यांना हे सांगितलं. त्यांनी पर्यावरण मित्र एड. विजय देठे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याचा सल्ला दिला. त्यामुळे आम्ही दोघांनी विजयभाऊंसोबत चर्चा करून देवाडा येथे जाण्याचं ठरवलं.

दुसऱ्याच दिवशी आम्ही दुचाकीने देवाडा या छोट्याशा आदिवासी बहुल वनग्रामात पोहोचलो. हे गाव चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या कोर-बफर क्षेत्रावर आहे. जिल्ह्याच्या ठिकाणाहून 25 कि.मी. अंतरावर असलेल्या या गावात आम्ही स्थानिक ग्रामपंचायत सदस्य दिवाकर कुळमेथे, विकास गेडाम, गणेश कोरवते यांची भेट घेतली. ते आम्हाला नावाने ओळखत होते, पण प्रत्यक्ष भेट पहिल्यांदाच झाली.

माधवभाऊंनी गावकऱ्यांना आमच्या कामाचा उद्देश सांगितला. गावकऱ्यांनी तात्काळ सभा बोलावली. महिलाही सहभागी झाल्या. चर्चेत लोकांचा रोष दिसून आला, "आमचा रोजगार वनखात्याने हिरावला. आम्हाला जगण्याचा मार्ग नाही. काम द्या!" या भावना व्यक्त झाल्या.

लोकांना रोजगार हमी योजनेतून काम देण्याचा विचार माझ्या मनात आला, पण वनखात्याचा विरोध, सरकारी अडचणी यांची भीती होती. तरीही आम्ही "मागेल त्याला काम" या आधारे लोकांना शांततेच्या मार्गाने काम मिळवून देण्याचं आश्वासन दिलं.

गावात 135 कुटुंबे आहेत, त्यात 24 दलित आणि 111 आदिवासी कुटुंबे. 12 कुटुंबे शेती करतात, त्यातील केवळ 4 कुटुंबांना वनपट्टे मिळाले आहेत. बाकी सर्व गावकरी अल्पभूधारक. शेतीच्या जोडीला वनोपज गोळा करून उदरनिर्वाह करणारे. जंगलातील मोह, टेंभूर फळ, तेंदुपत्ता गोळा करुन विकणे, बांबू आणून त्याचे कडे, डाले तयार करुन विकणे, हा या लोकांचा पारंपारिक व्यवसाय. मात्र पर्यटन वाढले आणि वनविभागाने जंगलात जाण्यावर, बांबू, तेंदुपत्ता, फळं, लाकूडफाटा, मोहफूल आणण्यावर बंदी घातली. पारंपरिक व्यवसाय बंद झाल्यामुळे लोक बेरोजगार झाले.

नववर्षाच्या पहिल्या दिवशी, 1 जानेवारी 2020 ला, गावात मीटिंग घेऊन रोजगार हमी योजनेची माहिती दिली. “मागेल त्याला काम, मागेल तेव्हा काम आणि कामाप्रमाणे दाम” याची ग्वाही देणारा रोजगार हमीचा कायदा देशभर लागू आहे. पण आजवर देवाडातल्या लोकांना त्याची काहीच माहिती नव्हती. 135 कुटुंबांपैकी एकाकडेही जॉब कार्ड नव्हतं, त्यामुळे कोणत्याही सरकारी योजनेचा लाभ मिळालेला नव्हता. गावात एकाही कुटुंबाला घरकुल योजनेचा लाभ मिळाला नव्हता!

मिटिंगमध्ये सर्वांनी ग्रामपंचायतीकडे जॉब कार्डसाठी सामूहिक अर्ज केला. पण देवाडा गाव भद्रावती तालुक्यात असून ग्रामपंचायत मोहर्ली ही चंद्रपूर तालुक्यात येते, त्यामुळे जॉब कार्ड कोणत्या पंचायत समितीतून द्यायचे हा प्रशासकीय हा प्रश्न ग्रामसेवकाला पडला. जॉब कार्डची प्रक्रिया गुंतागुंतीची आहे असे सांगून तो टाळाटाळ करू लागला.

ग्रामसेवकाच्या दिरंगाईनंतर लोकांनी एकत्र येऊन कामाची मागणी करण्याचा निर्णय घेतला. 10 जानेवारी 2020 रोजी 153 मजुरांनी अर्ज केला. पोचपावती म्हणून नमुना 5 वर सहीशिक्का घेतला. त्या दिवसापासुन रोजगार सेवकाने स्वतःच गावात येऊन जाबकार्ड बनविण्यासाठी गावातील सर्व कुटुंबाचे आधार कार्ड, बँक पासबुक आणि फोटो जमा करणे सुरू केले. कामांना गती मिळाली. 23 जानेवारीला म्हणजे अर्ज केल्यापासून 13 दिवसांनी गावात तलाव खोलीकरणाचं काम सुरूही झालं. पहिल्या दिवशी 113 मजुरांना काम मिळालं आणि 93 कुटुंबांना जॉब कार्ड वितरित करण्यात आलं.

गावात पहिल्यांदाच रोजगार हमीचं काम सुरू झालं. बेरोजगारीनं त्रस्त लोकांच्या हाताला काम मिळालं. लोक आनंदित झाले. याचा परिणाम 2021 मध्ये झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीतही झाला. रोजगार हमीच्या कामात सक्रिय असलेले विकास गेडाम यांना उपसरपंच म्हणून लोकांनी निवडून दिलं. रोजगार हमीच्या प्रक्रियेतून नवनेतृत्व पुढे आलं.

निवडून देऊन लोकांनी त्यांना विकास गेडामच्या कामाची पावती दिली. आता लोकांच्या आशाही वाढल्या. विकासने गावकारभारातही चांगले लक्ष घातले. आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय चिमूर येथे घरकुलासाठी अर्ज केले आणि ९६ कुटुंबांसाठी घरकूल मंजुरी मिळवली.

हक्काचे घर मिळाले, रोजगार हमीतून हाताला काम मिळाले, देवाडा गावाला आपल्या प्रगतीची आणि स्वाभिमानाने जगण्याची दिशा सापडली होती. ही माहिती शेजारच्या जुनोना गावात पोहोचली, तिथेही रोजगार हमीची कामं सुरू झाली. कायद्याचा आधार घेऊन सातत्याने काम केल्यास चिरकाल टिकणारं यश मिळते, हे गावकऱ्यांच्या लक्षात आलं आहे.

**9370077456**

# समस्याग्रस्त महिलांची हक्काची सखी सुनिता

कमलाकर गंगाराम चिकटे

वयाच्या अवघ्या सातव्या वर्षी वडिलांच्या मृत्यूने पोरकी झालेली सुनिता ते आजची हिंसाचार पीडित महिलांचा आधार बनलेली सुनिता.... हा प्रवास खूप चढउतारांचा आहे. संकटांवर मात करून स्वावलंबनाच्या मार्गावर चालणाऱ्या सुनिताची ही गोष्ट.

आजारपणामुळे वडिलांचा मृत्यू झाला तेव्हा सुनिता केवळ सात वर्षांची होती. सुनिता आणि तिची तीन भावंडं वडिलांच्या मायेला हरपली, पण आई गुणाबाईनं तिचं मायेचं छत्र आणखी मोठं केलं. चार लेकरांचं पालनपोषण, शिक्षण, घरच चालवणं यांचा खर्च, जोडीला पतीच्या आजारासाठी काढलेलं सावकाराचं कर्ज. गुणाबाईनं आपलं आयुष्य कामाला जुंपून घेतलं. सकाळी केळी विकायला जायचं आणि नंतर शेतमजुरीला, हे तिचं दैनंदिन जीवन होतं.

काही वेळा ती केळीची विक्री भाकरीवर करायची, ती भाकरी लेकरांसाठी ठेऊन रोजंदारीला जायची. टोपल्यातल्या मोजक्या भाकरी भावंडं पुरवून खायचे. वयाच्या मानानं जास्त शहाणी आणि समजूतदार झालेली ही भावंडं. मोठा दगडू आधी लहान भावंडांना द्यायचा, मग स्वत: खायचा. सुनिता आपल्यातला कोर दादासाठी बाजूला ठेवायची. सगळ्यात लहान सोमनाथसाठी भाकरी तुकडे वाळवून ठेवायची. त्याला भूक लागली की चहात बुडवून वाळलेली भाकर चारायची.

अशा ओढाताणीच्या परिस्थितीतही सुनिताचं शिक्षण चालू होतं. पण दहावीत असताना तिच्या जीवनात मोठं वळण आलं. तिच्या लग्नाची बोलणी सुरू झाली. तिनं विरोध केला. पण 'आपली गरीबी की आहे. मुलगा नोकरदार आहे,' असं सांगून आईनं तिचं मन वळवलं. लग्न झालं. वर्षभर आनंदात पार पडलं. नंतर पतीचे खरे रंग दिसू लागले. त्याला दारूचं व्यसन होतं. त्यामुळे नोकरीकडे दुर्लक्ष होत होतं. पगार घरी येत नव्हता. कामावरून कमी करण्याची नोटीस मिळाली होती. असेच दिवस जात होते.

आता सुनिता दोन मुलांची आई झाली, तिसऱ्या वेळेला दिवस गेले. पण नवऱ्याला जबाबदारीचं भान नव्हतं. त्याचं कामावर लक्ष नव्हतं. लेकरांना सांभाळत, मोलमजुरी करत सुनिता कसंबसं घर चालवत होती. नवऱ्याचं पिणंही वाढलं होतं. तशात त्याला कावीळ झाली. आजार वाढतंच गेला. त्यातच त्याचा मृत्यू झाला. त्यावेळी नवं बाळ अवघं दीड महिन्याचं होतं.

नवऱ्याच्या जाण्याने सुनिता मनानं खचून गेली. आई गुणाबाईने तिला मानसिक आधार देत पुन्हा

उभं केलं. मात्र सासरच्या मंडळींनी नाही समजून घेतलं. कसंबसं वर्षभर चांगलं वागले, पण नंतर त्रास सुरू झाला. टेलरकडून घरी आणून हातमोजे शिवण्याचं काम करू लागली. एक डझन शिवले की तीन रूपये मिळायचे. घरकाम सांभाळून कधी दोन तर कधी तीन डझन व्हायचे. आठवड्याचे 60-70 रूपये मिळायचे. पण तिच्या कष्टाचे पैसेही सासू घ्यायची. भावजयांपेक्षा जास्त घरकाम तिला करावं लागायचं.

मानसिक आणि शारीरिक कुचंबणा सुनिताला असह्य होऊ लागली. काय करावं कळेना. सासर सोडून आईकडे जावं तर तिचीही गरीबी. काहीच मार्ग दिसेना. सुनिता मनानं खचून गेली. अशा नाजूक अवस्थेत आत्महत्येच्या विचारानं तिच्या मनात शिरकाव केला. आणि तिचा निर्णय पक्का झाला. मुलांसह विहिरीत उडी मारून सगळं संपवायचं! एके दिवशी मुलं शाळेतून घरी आल्यावर त्यांना सोबत घेऊन ती गावाबाहेच्या विहिरीकडे निघाली. गावातल्या सीतारामभाऊनं तिला त्या मनस्थितीत विहिरीशी पाहिलं. तिची विचारपूस केली. समजून घालून सुनिताला माघारी पाठवलं आणि लगेच तिच्या आईला कळवलं. मोठा अनर्थ टळला.

सुनिता लेकरांसह माहेरी आली. तिची आई गावातल्या बचत गटात सक्रिय होती. गटामुळे गावात महिलांवर होणाऱ्या  अन्यायाची जाणीव होती. आईने सुनिताला आधार दिला. तिची कहाणी गटातल्या महिलांना सांगितली. गटातील महिलांनी सुनिताला 4,000 रुपये मदत म्हणून देण्याचं ठरवलं, ज्यातून तिने शिवणकामाची मशीन घेतली आणि कपडे शिवण्याचं काम सुरू केलं.

आईसोबत माहेरी राहत असताना, घरात आई आणि भावजयमध्ये सतत वाद होत असल्याने गुणाबाईंनी स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला. सुनिताने शेतातील मजुरी करून आणि संध्याकाळी कपडे शिवून घरखर्च चालवायला सुरुवात केली. पण शेतमजुरीत त्रास होत असल्याने गुणाबाईंनी बचत गटाच्या कार्यकर्त्यांकडे सुनिताला काम देण्याची विनंती केली. गटाने तिच्या क्षमतेला ओळखून तिला संस्थेच्या कामात सामील केलं आणि 3,000 रुपये मासिक वेतन देण्याचं ठरवलं. सुनिताने पाच गावांमध्ये काम करण्यास सुरुवात केली. सकाळी ती गावांमध्ये जाऊन, दुपारी परत येऊन कपडे शिवत असे. कपड्यांबरोबर सुनिता आपलं आयुष्यही पुन्हा जोडू लागली.

पण एकट्या बाईवर अनेक नजरा रोखलेल्या असतात. “ही विधवा मुलगी रोज पर्स घेऊन कुठे जाते? काय करते?” गावात कुजबूज सुरू झाली. हे बोलणं सुनिताच्या भावाच्या कानावर गेलं. नाराज भावानं तिला गावाबाहेर कामाला जायला मनाई केली. या भांडणामुळं सुनिता खचली. सगळं संपवावं असं परत तिच्या मनानं घेतलं. त्या भरात तिनं गोळ्या खाल्ल्या. आईची ती अवस्था पाहून लहानगा रूपेश मोठ्यानं रडू लागला. आवाज ऐकून शेजारच्या कोमलताई धावत आल्या. सुनितानं खाल्लेली तीन पाकीटं दिसली आणि झाला प्रकार त्यांच्या लक्षात आलं. वेळीच दवाखान्यात उपचार मिळाले आणि सुनिता वाचली.

सुनिताची मानसिक अवस्था नाजूक होती. तिला संस्थेनं समजून घेतलं. घरच्यांचं, समाजाचं

दडपण तिच्या मनावर होतं. ते दूर व्हायला पाहिजे असं वाटून संस्थेनं तिला हळूहळू महिलांच्या कामात सामावून घेतलं. संस्थेनं सुनिताला अशा महिलांशी संवाद साधण्याचं काम दिलं, ज्या एकट्या राहत असून कुटुंबाची जबाबदारी सांभाळत होत्या. त्यांच्या अडचणी समजून घेऊन रिपोर्ट तयार करण्याचं काम तिला देण्यात आलं. या महिलांशी संवाद साधताना सुनिताला जाणवलं की, तिच्या पेक्षा अधिक संघर्ष करणाऱ्या अनेक महिला आहेत. त्यांच्या अनुभवांतून तिला पुन्हा जगण्याची उमेद मिळाली. 'मी एकटी नाही, माझी सोबत करण्यासाठी माझ्यासारख्या अनेकजणी आहेत,' हे धाडस तिच्यात आलं.

आपल्या जगण्याचा खरा सूर गवसलेली सुनिता आज महिलांना संघटित करण्याचं काम करते. त्यांचे प्रश्न, अडचणी समजून घेते, ते सोडविण्यासाठी प्रयत्न करते. आता संघटन भक्कम होतंय आणि संघटनेच्या जोडलेल्या महिलाही. सुनितानंही आता जगण्याचा, समस्यांचा सामना करण्याचा निर्धार केला आहे. सोबतच्या महिलांच्या सुख-दुःखात सहभागी होत, त्यांच्या अडीअडचणीत सोबत करत सुनिता संघटनेच्या नेतृत्वाची जबाबदारी सांभाळत आहे. विशेष म्हणजे, या कामाची दखल घेत मॅक्स महाराष्ट्र व राज्य महिला आयोग यांनी सुनिताला पुरस्कार दिला आहे.

**9763747310**

# ऊसतोडीमुळे शिक्षणाची आबाळ

जीवन राठोड

बीड. ऊसतोड मजुरांचा जिल्हा म्हणून ओळख असलेला महाराष्ट्रातला जिल्हा. इथले चार ते पाच लाख मजूर दरवर्षी आपलं गाव सोडून ऊसतोडणीसाठी सहा-सहा महिने महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्रप्रदेश, तमिळनाडू आणि तेलंगणासारख्या बाहेरच्या राज्यांमध्ये जातात.

पवनचं गावही याला अपवाद नाही. गाव म्हणजे साधारण 200 ते 250 लोकांची वस्ती. एकाच समाजाच्या लोकांची. वस्तीच्या आसपास पाण्याचा पत्ता नाही. सतत दुष्काळाच्या झळा सोसाव्या लागतात. इथले वस्तीतले 80 टक्के लोक आजही ऊसतोडणीसाठी स्थलांतर करतात.

पवनच्या लहानपणापासूनच त्याचे आई-वडील ऊसतोडणीसाठी जात होते. त्यालाही सोबत नेत होते. वडील आठवी पास होते. त्यांचे वडील म्हणजे पवनचे आजोबादेखील ऊसतोडणीचं काम करत असत. वडिलांना पोलीस शिपायाच्या नोकरीसाठी कॉल आला होता, पण घरातील जबाबदाऱ्या आणि आर्थिक अडचणींमुळे त्यांनी ती नोकरी नाकारली. त्यांना पाच बहिणी. त्यातल्या दोघींची लग्न झालेली. तीनजणींच्या लग्नाची जबाबदारी वडिलांवर होती. शिवाय आजोबांना दारूचे व्यसन. त्यामुळे घराची आवक मर्यादित. घरची जमीन विकून सर्व लग्नांचा खर्च भागवावा लागला.

पवनला चार भाऊ आणि एक बहीण. घरात सांभाळायला कोणी नसल्याने सगळे आईवडिलांबरोबर ऊसतोडणीला सोबत जात. त्यावेळी त्यांची टोळी पंढरपूरजवळ ऊसतोडणी करत होती. आठ-दहा दिवसांत एक फड संपला की सगळा पसारा उचलून दुसऱ्या फडाकडे जावं लागायचं. सहा-सहा महिने गावापासून लांब फडावर राहिल्यानं सर्वच भावंडांची शिक्षणं अर्धवट राहिली.

अशीच अनेक वर्षं ऊसाच्या फडात गेली. नंतर पवनच्या आजीनं घरी राहायचं ठरवलं. ज्यामुळे मुलांना फडावर जायची गरज नाही आणि त्यांचं शिक्षण होईल. शाळेत दाखल होताना मोठ्या भावाला आणि पवनला एकाच वर्गात प्रवेश मिळाला! पण ऊसतोडणीमुळे सततचं स्थलांतर. कधी शाळा, कधी फड. शिक्षणात अडथळे येतच राहीले. तरीही पवन 12वी पर्यंत आला. पण बारावी पास करता आली नाही. मोठा भाऊ मात्र पास झाला. त्यानं डीएड केलं. पवननं एक वर्ष शेतीत काम केलं. नंतर पुन्हा शिक्षण सुरू केलं, पण फारसं यश मिळालं नाही.

पवनची कहाणी एका बाजूला, पण त्याच्या वर्गातील अनेक मित्र अजूनही अवघड परिस्थितीत जगत आहेत. काहींनी मुलींचं 14व्या वर्षी लग्न लावून दिलं, तर मुलांचं 16व्या वर्षी लग्न करून दिलं. ऊसतोडणीसाठी आणखी एक पूर्ण कोयता घरात मिळाला.



पवनच्या मनात येतं की आमची शिक्षणाची आणि जगण्याची ही आबाळ अशीच कुठवर चालणार? शाळेत जायला मिळतं, शिकायची गोडी लागते तोवर शिक्षणात खंड पडतो. शिक्षणाचा झोका कधी उंच तर कधी पार खाली. 'ऊसाचं पाचट असतं तसं आमचं आयुष्य झालंय,' असं त्याच्या मनात येतं. प्रत्येक पिढी या समस्यांचा सामना करतेय. बदलासाठी संघर्ष करतेत.

9765145893

# वतनी जमिनींवर सामुदायिक शेतीतून परिवर्तन करणारे हातीद

नंदू मोरे

सोलापूर जिल्ह्यातील हातीद गावातला धडाडीचा युवक उमेश. जो दलित, अल्पभूधारक वा भूमीहीन समुदाय मजुरीसाठी मोठ्या शेतकऱ्यांवर अवलंबून होता, त्यांना उमेशने स्वावलंबी जगण्याचा मार्ग दाखवला. त्यानं दलित समाजातल्या 16 कुटुंबांना एकत्र करून सामुदायिक शेतीच्या माध्यमातून शाश्वत जीवनाधार निर्माण केला. हा खडतर प्रवास त्याने कसा पार केला त्याची ही गोष्ट.

हातीद हे सुमारे 4500 लोकसंख्येचं सांगोला तालुक्यातलं एक गाव. हा दुष्काळी तालुका. इथे सिंचनाची सोय असलेले संपन्न लोक शेती आणि पूरक व्यवसाय करतात. तर दलित समाजातील बहुतेक कुटुंबं आपल्या उदरनिर्वाहासाठी सधन वर्गावर किंवा स्थलांतरित मजुरीवर अवलंबून आहेत.

तशा ब्रिटिश काळात दलित समाजाला वतन जमिनी मिळाल्या आहेत. पण गैरहस्तांतरणामुळे त्यातल्या बहुतेक जमिनी सरकारच्या ताब्यात गेल्या, तर समाजाकडे असलेल्या जमिनी सिंचनाचा अभाव, भांडवल आणि संसाधनांची कमतरता यांमुळे पडीक होत्या. अशी 45 एकर वतनी जमीन हातीद गावात होती.

बारावी झालेल्या उमेशला पुढं शिकायचं होतं. पण आर्थिक अडचणींमुळे शिक्षण थांबलं. आई-वडील आणि दोन भाऊ यांच्यासोबत तोही मजुरीला जाऊ लागला. कुटुंबाच्या वाट्याला आलेली 2 एकर जमीन सिंचित नसल्याने पडीकच होती. ती पडीक जमीन विकसित करण्याचा उमेशचा विचार होता.

याच काळात उमेशचा 'डॉ. आंबेडकर शेती विकास व संशोधन संस्थे'शी परिचय झाला. संस्थेच्या "स्थलांतरित मुलांचे शिक्षण" या प्रकल्पात उमेश स्वयंसेवक म्हणून काम करू लागला. संस्थेने सांगोला तालुक्यातल्या दलित समाजाच्या जमिनींचा अभ्यास केला, त्यानुसार तालुक्यात 5220 एकर वतन जमिनी अस्तित्वात होत्या. पण सगळ्या सामुदायिक मालकीच्या. त्यावर कसण्यासाठी व्यक्तिगत लाभाच्या योजना मिळत नव्हत्या आणि सामुदायिक जमिनी विकसित करण्याच्या योजना अस्तित्वात नव्हत्या.

अभ्यासातून असे दिसून आले की आवश्यक संसाधने, भांडवल, सिंचनाचा अभाव, कुटुंबाच्या हिश्शाचा अत्यंत कमी आकार आणि शासनाच्या काही जाचक नियमांमुळे असलेल्या जमिनींचा दलित समाजाला काहीच फायदा होत नाही. परिणामी बहुतांश जमिनी पडीक राहतात. संस्थेने डोंगरगावमध्ये सामुदायिक शेती यशस्वी करून अशा पडीक वतनी जमिनी विकसित व उपजाऊ करण्याचे मॉडेल

तयार केले. जे इतर गावांत लागू होण्यासारखे होते.

ही कल्पना उमेशला आवडली. त्यानं त्याच्या गावातली जमीन उत्पादक करण्यासाठी पुढाकार घेतला. समाजातल्या लोकांना एकत्र करून त्यानं डोंगरगावची गोष्ट समजाऊन सांगितली. पण कोणीच त्याचं म्हणणं मनावर घेतलं नाही.  लोकांना फक्त प्रश्नच दिसत होते: शेतीसाठी पाणी कसं आणणार? मशागत कशी करणार? सामुदायिक शेतीत कष्ट करायला कोण तयार होणार? इत्यादी. उमेशनंही जिद्द सोडली नाही. तो लोकांशी सतत बोलत राहिला. लगेचच्या प्रश्नांपेक्षा दूरगामी फायदे लोकांना पटवून देत राहिला. आपलं मजुरीवर अवलंबून असणं हे आपल्या गरिबीचं, अशिक्षितपणाचं आणि सक्तीच्या स्थलांतरामागचं मूळ कारण आहे, हे तो समजावत राहिला.

कालांतराने लोक प्रतिसाद देऊ लागले. चर्चेसाठी एकत्र बसू लागले. यातून 'डॉ. आंबेडकर कृषी पंचायत' हा स्थानिक शेतकरी गट तयार झाला. संविधानिक मूल्यांची जाणीव असलेल्या उमेशसाठी गटात महिलांचा समावेश असणंही तितकंच महत्त्वाचं होतं. गटाची समज वाढवण्यासाठी सेंद्रिय शेती, शेती आधारित व्यवसाय, शेतीच्या विविध पद्धती असे वेगवेगळे कार्यक्रम त्यानं आयोजित केले. नव्या ज्ञानामुळे नव्या कामाची ओढ वाटू लागली.

संस्थेच्या मदतीने सामुदायिक जमिनीवर एक विहीर खोदली गेली. त्यावर पाईपलाईन टाकून जवळपास 20 एकर जमीन  सिंचित केली. आता पुढचं पाऊल सामुदायिक शेतीचं. पहिल्या वर्षी मका पेरायचं ठरलं. सर्वांच्या कष्टातून पीक बहरलं. उत्पादनातून 4 लाख रुपयांचा नफा झाला, शिवाय जनावरांसाठी चारा झाला.

पहिलाच प्रयत्न यशस्वी झाल्यानं लोकांना आनंद झाला, त्यांचा आत्मविश्वास वाढला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सामूहिक शेतीबद्दलची सकारात्मकता वाढली. उमेशचीही उमेद वाढली. त्यानंतर जमिनीची उत्पादनक्षमता वाढतच गेली.

2015 पासून ते आजपर्यंत हातीदमधल्या उपलब्ध 45 एकर जमिनीपैकी 30 एकर जमीन उत्पादक करण्यात आली आहे.  इथे चार एकर डाळिंबाचं क्षेत्र आहे, तर पाच एकर ऊसाचं. अन्नधान्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ज्वारी, बाजरी, मका यासारखी पिकं घेतली जातात. प्रत्येक कुटुंब पालेभाज्या आणि फळभाज्या पिकवतं, आणि अनेक कुटुंबांकडे दुभती जनावरं आहेत. सामूहिक विक्री व्यवस्थेमुळे त्यांच्या मालाला चांगला भाव मिळतो. कुटुंबाना आर्थिक स्थैर्य लाभले आहे आणि स्थलांतर मोठ्या प्रमाणात कमी झालं आहे.

आर्थिक लाभाबरोबरच अनेक सामाजिक लाभही मिळाले आहे. महिलांना आत दुसऱ्या शेतकऱ्यांकडे मजुरीला जावं लागत नाही. स्थलांतर थांबल्यामुळे वणवण थांबली आणि मुलांचं शिक्षण कोणत्याही आडकाठीविना चालू राहतं. आपापल्या उदरनिर्वाहापुरतं पाहणारा समाज एक झाला. सलोखा आणि समतेचा पुरस्कार करू लागला.

उमेशच्या प्रयत्नांना गावाची साथ मिळाली आणि सर्वांचंच आयुष्य पालटलं. सामाजिक-आर्थिक स्तर उंचावला.  सामूहिक प्रयत्नांचे महत्त्व लोकांनी जाणले आहे. त्यामुळे हातीद सारख्या दुष्काळी भागात शाश्वत जीवनाधाराचं आदर्श मॉडेल उभं राहिलं. जे आसपासच्या गावासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

**डॉ. आंबेडकर शेती विकास व**
**संशोधन संस्था, सोलापूर**
**7875747475**

# शिक्षणाची गाडी पटरीवर आणणारे डोंगरगाव स्टेशन

सुरेश बाबर

एखाद्या लहानशा गावातल्या रेल्वे स्टेशनचे महत्त्व कितीतरी मोठे असतं. 'म्हसोबा डोंगरगाव' स्टेशनचं उदाहरण पहा. या स्टेशननं केवळ चलनवलनच सुकर झालं नाही, तर शिक्षण, व्यापार, विविध समुदायांचा एकोपा सर्वाला चालना मिळाली.

डोंगरगाव हे सांगोला तालुक्यातलं साधारण 2500 लोकसंख्येचं आणि विविध जाती-धर्मांच्या लोकांचं गाव. 1980च्या दशकात आंबेडकर जयंती निमित्त काढलेल्या मिरवणुकीवरून गावात जातीय तणाव निर्माण झाला. दलित-सवर्ण वाद उफाळला आणि सवर्णांनी दलित समाजावर बहिष्कार टाकला. रोजगार, रेशन आणि मजुरीपासून वंचित झालेल्या दलित समाजाने आपल्या वतनी जमिनी कसण्याचा निर्णय घेत 90 एकर पाणलोट क्षेत्राचा विकास हाती घेतला. ज्यामुळे जमिनीखालील पाण्याची पातळी वाढून आख्ख्या गावालाच लाभ झाला. तणावाचे वातावरण निवळू लागले. हा पूर्वेतिहास डोंगरगाव रेल्वे स्टेशनशीही जोडलेला आहे.

डोंगरगाव हे सोलापूर जिल्ह्याच्या टोकावर वसलेलं गाव. शासकीय योजनांपासून पूर्णत: दुर्लक्षित. गावाच्या जवळून ब्रिटीशकालीन लातूर-मिरज नॅरोगेज रेल्वे जायची, पण गावात थांबत नव्हती. रेल्वे पकडायला गावतल्यांना पाच किलोमीटरवरचं जवळा किंवा जत रोड स्टेशन गाठावं लागे. उच्च माध्यमिक शिक्षणासाठी बाहेरगावी जाणारे विद्यार्थी, शेतीमाल विकायला जाणारे शेतकरी, बाकी कारणाने बाहेर जाणारे प्रवासी, सगळ्यांनाच याचा त्रास होई. मुलींचे शिक्षण दहावीनंतर थांबे.

या समस्येवर गावकऱ्यांनी विचार केला आणि रेल्वे स्टेशनसाठी लढण्याचा एकमुखी निर्णय झाला. आधी विनंती अर्ज द्यायचा, त्याला प्रतिसाद मिळाला नाही तर एकत्र येऊन रेल्वे अडवायची, असं नियोजन ठरलं. महत्त्वाचं म्हणजे, रेल्वे संघर्षादरम्यान गावातले जुने जातीय तणाव विसरले गेले. रेल्वे संघर्ष समिती स्थापन झाली आणि तिचं नेतृत्व दलित समाजातील व्यक्तीने केलं, जे गावकऱ्यांनी मान्य केलं. सामाजिक सलोख्याचंच उदाहरण गावानं घालून दिलं.

ठरल्याप्रमाणे रितसर निवेदनं देण्यात आलं. शासकीय यंत्रणांशी पत्रव्यवहार केला. पण 15-20 दिवसांच्या पाठपुराव्यानंतरही सकारात्मक प्रतिसाद मिळेना. अखेर आंदोलनाची वेळ येऊन ठेपली. बैलगाड्या आणि जनावरं रेल्वे रुळांवर आणून आंदोलन सुरू झाले. सर्व जाती-धर्माचे गावकरी एकत्र आले. या सगळ्या आंदोलनाचे नेतृत्व गावातले तरुण ललित बाबर, बी.पी. कांबळे, वैजयंता बाबर, मोहन काटे यांनी केलं. रेल्वे अडवण्यात आली, तेव्हा प्रशासन चर्चेसाठी समोर आले. रेल्वे थांबा देण्याचं लेखी आश्वासन दिल्यानंतरच आंदोलन मागे घेतलं. ब्रॉडगेज रूपांतरणाच्या वेळी 'म्हसोबा डोंगरगाव'

नावाने रेल्वे स्टेशन मंजूर झालं.

आज डोंगरगावमध्ये चार ते पाच रेल्वे थांबतात. यामुळे शेतकरी, विद्यार्थी, महिला, आणि युवक सहज शहरात जाऊ शकतात. सांगोल्यातल्या आठवडी बाजारात डाळिंब आणि जनावरांच्या व्यापारात गावकऱ्यांचा सहभाग वाढला आहे. गावातील मुली शिक्षणासाठी बाहेर पडू लागल्या आहेत, आणि मुला-मुलींच्या शिक्षणाचं प्रमाण जवळपास समान झालं आहे. रेल्वे स्टेशनमुळे डोंगरगावच्या मुलींच्या शिक्षणाची गाडी आता पटरीवर आली आहे. सामूहिक संघर्षातून केवळ भौतिक नव्हे, तर सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तन कसं साधलं जातं, याचं हे बोलकं उदाहरण आहे.

9766734310

# सामाजिक कार्यकर्त्यालाही ऊर्जेची गरज असते

पंकज शिंदे

त्या दिवशी एक फोन आला. "सर कसे आहात? मी सुदीप सपकाळ बोलतोय." खूप दिवसांनी त्याचा फोन आला होता. तेही एक आनंदाची बातमी सांगायला. "तुम्ही दिलेली रोपं आता मोठी झाली आहेत. त्यांना भरपूर मोहर आलाय..." तो उत्साहात बोलत होता.

महाडमध्ये स्वदेश संस्थेचे काही प्रकल्प राबवताना जे अनेक लोक जोडले गेले त्यातला हा सुदीप. त्यावेळी आम्ही रात्री उशिरापर्यंत गावागावात मिटिंगा घेत होतो. तरुण, लहान मुलं, महिला, शेतकरी, वृद्ध सर्वांशी चर्चा करायचो. शक्य तिथे मार्गदर्शन, प्रेरणा देण्याचा प्रयत्न असायचा. या सततच्या संवादातून गावातल्या प्रत्येकाशी एक कौटुंबिक नातं निर्माण व्हायचं. ह्या मंडळींना मला त्यांच्या "हक्काचं माणूस" समजू लागली.

अशा व्यक्तींमधला एक सुदीप सकपाळ. फारसं औपचारिक शिक्षण नव्हतं. पण "काहीतरी वेगळं करायचंय" ही धडपड असणारा. म्हणून चांगलाच लक्षात राहिलेला. संस्थेच्या मदतीने सुदीपनं शेळीपालन, कुक्कुटपालन आणि फळबाग लागवड केली. सुरुवातीला लहान युनिट्स सुरू केली. ती मेहनतीतून वाढवली. आज तो 300 पेक्षा जास्त आंबा, काजू, बदामांची झाडं, पाच म्हशी, 50 पेक्षा जास्त शेळ्या, कोंबड्या असा मोठा व्याप सराईतपणे सांभाळतोय. या प्रत्येक गोष्टीवर त्याचा जीव आहे. म्हणूनच मोहर आल्याची बातमी सांगायला त्याचा फोन आलेला. "पहिलं फळ लागलं की तुम्हाला नक्की बोलावतो खायला!" हे सांगत त्यानं निरोप घेतला.

असे फोन आनंद देतात, आणखी कामाचे बळ देतात. सामाजिक कार्यकर्ते झोकून देऊन काम करतात. कधीकधी आपल्या व्यक्तिगत गरजांकडे, कौटुंबिक जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष होते. अनेक कार्यकर्त्यांची परिस्थिती बेताची असते. पण आपण समाजाचं देणं लागतो ही भावना त्यांना स्वस्थ बसू देत नाही. कधी निराशा येते, तर कधी नकारात्मक विचार मनाचा ताबा घेतात. कामाचा थकवा आणि मनावरील मळभ दूर करायला सुदीपसारख्यांचे फोन पुरेसे असतात. अशा जिवाभावाच्या कॉलस् मधून आपली दिशा योग्य आहे याची खातरजमा होते. सकारात्मक ऊर्जेचा बूस्टर डोस मिळतो.

9822337501

# जल व मृदा संधारणाच्या कामातून जलसमृद्ध झालेले तुपेवाडी

पुष्कराज तायडे

जालन्याच्या बदनापूर तालुक्यातील तुपेवाडी गाव. आधी दुष्काळाच्या झळा सोसणारे हे गाव, आज मनरेगाच्या (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) प्रभावी अंमलबजावणीमुळे जलसमृद्ध झाले आहे. हा कायापालट गावकऱ्यांनी कसा केला याची ही गोष्ट.

जालना-राजूर महामार्गावरचं तुपेवाडी हे एक टंचाईग्रस्त गाव. त्यातही 2010 ते 2018 दरम्यान गावाने तीव्र दुष्काळ अनुभवला. नदी-नाले कोरडे पडले, विहिरी तळाला गेलेल्या आणि आसपासचे पाणवठेही ओसाड झाले. पूर्ण जालना जिल्हा पाण्याच्या टँकरवर अवलंबून होता. जनावरे छावण्यात धाडावी लागत होती. पाण्याअभावी लोकांचे स्थलांतर सुरु झाले. शेती ओसाड पडली, शेतकरी आणि मजूर आर्थिक संकटात सापडले. हाताला काम नव्हते, खिशात पैसे नव्हते आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा हा प्रश्न सर्वांना सतावत होता. तुपेवाडीदेखील याला अपवाद नव्हते.

अशा कठीण परिस्थितीत 'सेंटर फॉर ॲग्रीकल्चर अँड रूरल डेव्हलपमेंट' (CARD) संस्थेनं पुढाकार घेतला. शासन दरबारी पाठपुरावा करून रोजगार हमी योजनेतून मोठ्या प्रमाणात काम उपलब्ध करून दिले. सुमारे 1200 मजूर समतल चर, वृक्ष लागवड, बांधबंदिस्ती, आणि सिंचन विहिरीच्या कामांवर राबू लागले.

सुरुवातीला गावकरी साशंक होते. योजना प्रभावीपणे राबवली जाईल का, वेळेवर मजुरी मिळेल का, याबद्दल गावकऱ्यांना शंका होती. CARD संस्थेच्या प्रकल्प समन्वयक सुरेखा सातपुते-पगार यांनी या योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित केली. गरजूंनी फॉर्म भरून पंचायत समिती आणि तहसील कार्यालयात सादर केले. सततच्या पाठपुराव्यामुळे वेळेत मस्टर काढले गेले, कामं सुरू झाल्यावर त्यांचं मोजमाप वेळेत होईल याची काळजी घेतली. त्यामुळे मजुरांना वेळेवर काम व त्याचा मोबदला मिळू लागला. केवळ रोजगार उपलब्ध केला नाही तर गतिमान अंमलबजावणीतून दुष्काळ निवारणाची कामं पूर्ण केली.

यशस्वी अंमलबजावणीसाठी तत्कालीन सरपंच बाबासाहेब निलक, रतनकुमार नाईक, माजी सरपंच एकनाथराव मोरे, ग्रामसेवक निलेश नक्का, जगदीश लताड, आणि ग्राम रोजगार सेवक देविदास चव्हाण यांनी महत्त्वाचे सहकार्य केले. केंद्र सरकारच्या अन्न सुरक्षा योजना, समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजना, आणि 12 कलमी कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठीही प्रयत्न करण्यात आले.

मनरेगातून केलेल्या जलसंधारणाच्या कामांमुळे पावसाचे पाणी अडवले गेले आणि विहिरींची पाण्याची पातळी वाढली. तुपेवाडीची जमीन हलकी आणि डोंगराळ असल्याने शेती पावसावर अवलंबून होती. मात्र, मनरेगाच्या कामामुळे शेतकऱ्यांनी आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा स्वीकार केला. आज तुपेवाडीत 1800 हून अधिक शेडनेट हाऊस आहेत, जिथे मल्चिंग पेपर, ठिबक सिंचन वापरून पाण्याची बचत केली जाते. यामुळे शेतकरी अधिक काळ उत्पादन घेऊन कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न मिळवत आहेत. गरजूंना शेतीत हंगामी रोजगार आणि उन्हाळ्यात मनरेगाच्या माध्यमातून रोजगार मिळत असल्याने स्थलांतराचे प्रमाण कमी झाले. शेतमालाच्या उत्पादनात लक्षणीय वाढ झाल्याने गावातील शेतकरी आर्थिक दृष्ट्या मजबूत झाले.

20 वर्षांपूर्वी तुपेवाडीमध्ये एकही माढी नव्हती. आज ही स्थिती बदललेली आहे. आज शेतकरी पाणी आणि खतांचा योग्य वापर करून संपन्न होत आहेत. रोजगार हमी योजनेमुळे तुपेवाडीला दुष्काळाच्या छायेतून भरभराटीकडे वाटचाल करता आली.

**9040826832**

# शून्यातून शिखराकडे वाटचाल करणारी कोसी ग्रामसभा

मिनाक्षी नाकाडे

बाबा....'' विनयनं मारलेली हाक आसमंतात घुमली अन् दाट झाडीचे ते जंगल शहारून उठलं. थोड्या अंतरावर असलेले त्याचे बाबा, सुधाकर काका, विनयला हाळी देत त्याच्याकडे धावले. त्यांना दिसला रक्तानं माखलेला विनयचा हात आणि काही अंतरावर उभा असलेला रागानं पाहणारा फॉरेस्ट गार्ड.

“अरे.....विन्या ..काय केलास बे पोरा... सांगतोय हाता पायावरचे काम करू नको...पण नाही माझी ऐकुशीच वाटत नाही ना....'' बाबा त्याच्यावर ओरडत म्हणाले तसं आधीच भीतीने आणि भळभळणाऱ्या जखमेनं रडवेला झालेला विनय अजूनच घाबरला. गार्ड बघून सुधाकर काकांच्या छातीतही धस्स झालं. 'आता आपलं काही खरं नाही ....' हा विचार मनात दाटून आला. खेड्या पाड्यातली माणसं निव्वळ फणसासारखी. वरून काटेरी आणि पण आतून रसरशीत गोड गरासारखी!! कष्टाळू तितकीच भित्री.

तो काळही तसाच होता. जल, जंगल, जमिनी विषयी काही अधिकार आहेत याची गावकऱ्यांना सुतराम कल्पना नव्हती. ते सतत एका अव्यक्त भीतीच्या सावटाखाली वावरायचे. आपल्या गावाच्या हद्दीतल्या जंगलातून साधं जळावू लाकूड आणायलाही लोक भ्यायचे. गार्डची भीती मनात ठाण मांडून असायची. घरात त्याची चर्चा व्हायची आणि मुलांच्या मनातही ही भीती घर करायची.

तेच आत्ताही झालं. विनय आणि सुधाकर काका जंगलात लाकूडफाटा आणायला गेले होते. तेव्हढ्यात तिथे गार्ड अवतरला. 'आता हा काहीतरी खंडणी नक्कीच घेणार....' सुधाकर काकांच्या मनात आलं. आपल्या लेकराच्या जखमेपेक्षा गार्डच्या खंडणीची त्यांना जास्त धास्ती होती.

पण आपले अधिकार समजले की भीतीच्या जागी आत्मविश्वास येतो. असंच जाणीवजागृतीचं बीज सुधाकर काकांच्या कोसी गावातही रूजलं. गावात 'ग्राम आरोग्य संस्थे'चे लोक आले. चौकाचौकात थांबून गावकऱ्यांशी चर्चा करू लागले. लोकांना फारशी माहिती नव्हती. म्हणून त्यांनी गावकऱ्यांची वेळ घेतली आणि दुसऱ्या दिवशी रात्री गावात सर्वांसाठी मिटींग घेतली. तिथे जवळपास नव्वद टक्के गाव जमलं. त्यांनी वनहक्क कायदा 2006, अधिनियम 2008 व सुधारित अधिनियम 2012 अशी बरीच माहिती त्यांनी दिली. आपल्या हितासाठी आपणच पाऊल टाकायची गरज आहे, हे लोकांना पटवून दिलं.

अशा पाच ते सहा भेटीगाठीनंतर त्यांनी लोकांचा विश्वास संपादित केला. वनहक्काचं काम म्हणजे आपल्या प्रगतीचं काम, भावी पिढ्या सुखी आणि समाधानात राहतील यासाठीचं काम, हे त्यांना पटलं. मग त्यांनी 'सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती' स्थापना केली. विरोधी लोक होते, त्यांचेही मन हळूहळू बाजूने वळवले.

या समितीचं अध्यक्षपदी एक महिला विराजमान झाली. गाव हळूहळू आपल्या हक्काविषयी जागं व्हायला लागलं.

ग्रामसभेत जंगलविषयक नियमावली तयार करण्यात आली आणि त्या नियमांनुसार गावचा कारभार सुरू झाला. गावातील सर्वात महत्त्वाचा आणि नफा देणारा व्यवसाय म्हणजे तेंदूपत्ता संकलन. या कामात जास्तीत जास्त नफा मिळवण्याचा आपला अनुभव ग्रुप ऑफ ग्रामसभा कुरखेडा यांच्याकडून समजला. ग्राम आरोग्य संस्था घाटी यांनी ज्याला तांत्रिक सहकार्य केलं. कोसी ग्रामसभेनं त्यानुसार काम करून अपेक्षेपेक्षा जास्त नफा कमावला. या यशामुळे ग्रामसभेचा आत्मविश्वास वाढला आणि गावकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली.

सर्व काही सुरळीत चालू असतानाच एक अनपेक्षित घटना घडली. घरकुल योजनेअंतर्गत काही गावकऱ्यांनी घर बांधण्यासाठी जवळच्या नदीपात्रातून वाळू आणण्याचा निर्णय घेतला. मात्र, वाळू आणण्यासाठी गेलेला ट्रॅक्टर तलाठी अधिकाऱ्याने जप्त केला आणि तो कुरखेड्याला तहसील कार्यालयात जमा केला. गावकऱ्यांनी याला विरोध केला, परंतु अधिकाऱ्यांनी त्याकडे साफ दुर्लक्ष केलं.

गावकऱ्यांनी तत्काळ ग्राम आरोग्य संस्थेला कळवलं आणि त्यांचं सहकार्य घेऊन ग्रामसभा बोलावली. सभेत ठरलं की, आपल्याला मिळालेल्या अधिकारांच्या जोरावर हा ट्रॅक्टर परत मिळवायचा. शासनाविरुद्ध लढाई सुरू झाली. अनेक पत्रव्यवहार झाले, आणि ट्रॅक्टरची किंमत एक लाख तीस हजार रुपये सांगितली गेली. हा गरीब गावकरी एवढी रक्कम उभी करू शकणार नव्हता. गावकरी त्याच्या पाठिशी राहिले.

समितीच्या अध्यक्षा विनाताई हलामी आणि इतर गावकऱ्यांनी तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन आपली बाजू मांडली. त्यांनी शासनाचे जीआर दाखवले, ग्रामसभेत तयार केलेली नियमावली सादर केली. गावकऱ्यांची एकजूट अधोरेखित झाली, आणि अखेर त्यांच्या संघर्षास यश मिळालं. एक रुपयाही न घेता गावकऱ्यांना गावकऱ्यांना परत देण्यात आला.

हा निश्चितच ग्रामसभेचा विजय आहे! स्वयंभू ग्रामसभा काय करू शकते याच हे उत्तम उदाहरण आहे!!

आज ही कोसी ग्रामसभा एक विकसित ग्रामसभा म्हणून पुढे आली आहे. तिथे दोन मोठी कामे चालू आहेत. पहिले, मानव विकास मिशन अंतर्गत 30 लाख रुपये किमतीचं गोडावून बांधकाम. आणि दुसरे, रोजगार हमी योजनेतून ग्रामसभेला मंजूर झालेल्या 7 लाखांच्या निधीतून 50 हजार रोपांच्या लागवडीचे काम.

गावात आज रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत आणि ग्रामसभेवरील लोकांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. शून्यापासून सुरू झालेला हा प्रवास आता शिखराकडे वाटचाल करत आहे.

**7448213385**

# दुष्काळमुक्त आणि जलयुक्त काठेवाडी

वसंत रावणगावकर

काठेवाडी हे नांदेड जिल्ह्यातल्या देगलूर तालुक्यातील एक छोटेसे गाव. 25 कुटुंबांच्या संमिश्र लोकवस्तीचं गाव. 25 च्या तीव्र दुष्काळाच्या अनुभवातून पोळलेल्या या गावाने आपला कायापालट कसा घडवला त्याची ही गोष्ट.

पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर भिस्त आणि दुष्काळाने त्रस्त झालेल्या काठेवाडीतला एक तरूण कार्यकर्ता राजू पाटील. गाव बदललायचं हा त्याचा ध्यास. राजूनं 'संस्कृती संवर्धन मंडळ' संस्थेची कामाबद्दल गावकऱ्यांना माहिती दिली. संस्थेनं आधी कित्येक गावं टँकरमुक्त केलीत. त्याच्या कहाण्या सांगत त्यानं लोकांना प्रेरित केलं. मग राजू आणि गावकरी यांचं एक शिष्टमंडळ प्रमोद देशमुखांना भेटायला गेलं. 'आमचं गाव दत्तक घ्या' म्हणत गावात पाणलोट क्षेत्र विकासाच्या कामासाठी सहकार्य करण्याची विनंती केली.

संस्थेनं या कार्यक्रमासाठी काही नियमांची काटेकोर अंमलबजावणी आवश्यक असल्याचं सांगितलं. ते गावकऱ्यांनी मान्य केल्यावर कामाची सुरुवात झाली.

संस्थेच्या टीमने पीआरए (Participatory Rural Appraisal) आणि शिवार फेरीद्वारे काठेवाडीची पाहणी केली. ग्रामसभा घेऊन माहिती दिली, अभ्यास सहल आयोजित केली, ज्यामुळे गावकऱ्यांची मानसिकता बदलली. प्रत्यक्ष श्रमदानाने सुरुवात झाली. गावकऱ्यांची आपली एकजूट व परिश्रम करण्याची अगदी सुरुवातीपासून जाणवून दिली.

नाबार्डच्या सहकार्याने राबवलेल्या या पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पामध्ये माथा ते पायथा या तंत्राचा अवलंब केला. सलग समतल चर, जल शोषक चर, बांधबंदिस्ती, नाल्यावरील गॅबियन बंधारे, सिमेंट बंधारे, फळबाग लागवड आणि सेंद्रिय शेतीसाठी विविध उपाययोजना राबविण्यात आल्या. ही कामे पहिल्या वर्षी झाल्यावर पुढील वर्षी गावाचे चित्र बदलायला सुरुवात झाली. आधी कोरड्या पडलेल्या विहिरींना आणि बोअरवेलना पाणी मिळू लागले. त्यानंतरच्या वर्षी पाण्याची उपलब्धता आणखी वाढली. काही वर्षांपासून बंद असलेले बोअरवेल पुन्हा चालू झाले. बंद पडलेल्या हातपंपांना एक दांडा मारला की पाणी येऊ लागले.

गाव जलयुक्त होऊ लागले. त्याचा फायदा कोरोनाकाळात दिसून आला. शहरातील उद्योग25व्यवसाय बंद पडल्याने स्थलांतरित गावकरी परत घरी आले. त्यांना गावात रोजगाराच्या संधी

निर्माण झाल्या. रिक्षावाले, बँडवाले, दुकानदार अशी ज्यांची ज्यांची कामं बंद झाली होती आणि ज्यांनी कधी कधी शेतीकाम केलं नव्हतं त्यांनाही उपजिविकेचं साधन मिळालं.

संस्थेच्या सल्ल्यानुसार शेतकऱ्यांनी पीक पद्धती बदलली. बदलत्या हवामानाशी जुळवून घेणारं बियाणं वापरायला सुरुवात केली. कृषी विज्ञान केंद्राच्या तांत्रिक मार्गदर्शनानं आणि शेतकरी उत्पादक कंपनीच्या स्थापनेनं शेतकऱ्यांना नवीन दिशा मिळाली. महिलांसाठी उपजीविकेचे उपक्रम राबवण्यात आले. ज्यामुळे गावाचा कायापालट शक्य झाला.

या अनुभवानं आता स्थलांतर करणारी कुटुंबं परत गावात आली. स्थानिक लघुउद्योग करू लागली. पडिक जमिनी पुन्हा शेतीखाली आल्या. प्रत्येक कुटुंबाचे दरडोई उत्पन्न वाढले. या बदलाचे श्रेय पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पाला आणि संस्थेच्या अथक प्रयत्नांना जाते. आज आसपासच्या गावातले लोक काठेवाडीला आवर्जून भेट देतात. आपल्या गावात असेच प्रकल्प राबवण्यासाठी संस्था आणि प्रशासनाकडे मागणी करतात. काठेवाडीची ही दुष्काळ मुक्तीची कहाणी इतर गावांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

**9403689338**

# जपले गावरान मिरचीचे वाण, राखली गावाची शान!

कृष्णा अंभूरे

नांदेड जिल्ह्यातल्या नायगाव तालुक्यातील बरबडा गाव. आहे. गोदावरी नदीपासून दीड किलोमीटर अंतरावर वसलेलं काळ्या-कसदार मातीचं हे गाव कोरडवाहू मिरची पिकासाठी प्रसिद्ध आहे. इथल्या गावरान लाल मिरचीला मोठी मागणी असायची. दूरदूरचे व्यापारी खरेदीसाठी यायचे. शेतकरी स्वतःचं बियाण जतन करून वापरायचे, त्यामुळे मिरचीचा दर्जा राखला जात होता.

पण गावाची ओळख असलेलं हे मिरची पीक संकटात सापडलं. हुमणी कीड आणि चुरडा-मुरडा हा विषाणूजन्य रोग यांचा प्रादुर्भाव वाढू लागला. पिकाला फटका बसला. विविध रासायनिक कीटकनाशकांचा वापर करून पाहिला, पण महागड्या औषधांमुळे खर्च वाढला, पण समस्या काही सुटली नाही. एकेकाळी गावात दीड हजार हेक्टरवर मिरचीची लागवड व्हायची, ते क्षेत्र हळूहळू घटायला लागलं. 2018-19 वर्षापर्यं मिरची लागवडीचं क्षेत्र अवघ्या 10 हेक्टरवर आलं. मिरचीऐवजी शेतकरी सोयाबीन, तूर, मूग, उडीद यांसारख्या खरीप पिकांकडे वळू लागले.

मात्र गावातले तरुण शेतकरी शिवाजी कोम्पलवाड आणि सदाशिव धर्माधिकारी यांनी गावरान मिरचीची लागवड सुरूच ठेवली. मर्यादित क्षेत्रावर उत्पादन केलं, मात्र पारंपरिक वाण जतन केलं. त्यांना पिकाचं पुनरुज्जीवन करायचं होतं. शेतकऱ्यांनी ‘संस्कृती संवर्धन मंडळ’ संचलित कृषी विज्ञान केंद्र, सगरोळी (जि. नांदेड) शी संपर्क केला. आपल्या समस्या मांडल्या.

सर्व बाबींचा विचार करून केंद्रानं शेतकऱ्यांना मिरचीवरील एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापनावर प्रशिक्षण दिले आणि निवडक शेतकऱ्यांना आवश्यक निविष्ठा पुरवल्या. या प्रशिक्षणातून शेतकऱ्यांना जमिनीची मशागत, पीक फेरपालट, सापळा पिके, कामगंध सापळे, चिकट सापळे, ट्रायकोडर्मा, मेटारायझियम, निंबोळी पावडर आणि निंबोळी अर्क यांचा एकात्मिक वापर करून कीड व रोगांचे व्यवस्थापन कसं करायचं याची सविस्तर माहिती झाली.

शेतकऱ्यांनी या सर्व बाबींची अंमलबजावणी वेळेवर केली. एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापनामुळे महागड्या रासायनिक कीटकनाशकांचा वापर करावा लागला नाही. पर्यावरणपूरक शेती केली गेली. परिणामी, खर्च कमी झाला आणि उत्पादनात वाढ झाली.

शेतकऱ्यांच्या जिद्द आणि मेहनतीमुळे गावात मिरचीची लागवडीचे क्षेत्रही वाढू लागले. 2018-19 मध्ये 10 हेक्टरवर मर्यादित असलेले मिरचीचे क्षेत्र 2023-24 मध्ये 80 हेक्टरपर्यंत वाढले. 2022-23 मध्ये शेतकऱ्यांना सरासरी प्रति एकर एक ते सव्वा लाख रुपये उत्पन्न मिळाले. खर्च वजा जाता, शेतकऱ्यांना प्रति एकर 75 हजार रुपये निव्वळ नफा मिळाला. मुख्य म्हणजे ‘गावरान मिरचीचे गाव’ ही गावाची ओळख जपली गेली!

8830750398

# चारोळी विक्रीचा उद्योग यशस्वी करणारे वागदरा

प्रफुल्ल उईके

"चारोळी विक्रीतून गटाला 60 हजार रुपयांचा फायदा झाला," वागदरा गावातल्या महिलांनी बैठकीत आनंदानं सांगितलं. हा नफा म्हणजे या महिलांचे परिश्रम, कष्टाची आणि शिकण्याची तयारी, हक्कांची जाणीव आणि संघटित ताकद या सर्वांचे फळ आहे.

वागदरा हे मारेगाव तालुक्यातील पेसा ग्राम पंचायत अंतर्गत येणारे गाव. कोलाम, गोंड, परधान आणि इतर पारंपरिक वन निवासी हे इथले रहिवासी. गावातल्या 154 कुटुंबांपैकी 80 कुटुंबे पिढीजात पद्धतीने वनोपज संकलन व विक्री करतात. वर्षातले 4-5 महिने या कुटुंबांची उपजीविका गौण वनोपजावर चालते, तर उर्वरित काळात ते शेती व मजुरीवर अवलंबून राहतात.

'अनुसूचित जमाती व पारंपरिक वन निवासी वन हक्क (मान्यता) कायद्या'नुसार वागदरा गावाला 225.77 हेक्टर क्षेत्राचा सामुदायिक वन अधिकार प्राप्त झाला आहे. उन्हाळ्यातले चार महिने गावकरी जंगलात गौण वनोपज गोळा करतात. यवतमाळ जिल्ह्यात साधारण 12 ते 15 प्रकारचे वनोपज उपलब्ध आहे. जी विविध उद्योगांसाठी उपयुक्त आहेत.

पण गावात किंवा तालुक्यात वनोपज खरेदी केंद्रच नव्हतं. गावकऱ्यांनी परिश्रमपूर्वक संकलित केलेलं वनोपज त्यांना व्यापारी लोक म्हणतील त्या कमी दरानं विकावं लागतं. महिलांनी त्यांची अडचण सांगितली. 'आम्ही मार्च ते मे या महिन्यात पारंपरिक पद्धतीनं चारोळी संकलन करतो.' चारोळी फोडण्यासाठी दगडाचा वापर करावा लागतो. त्यामुळे हाताला जखमा होतात. पण गावात साठवणुकीची सोय नसल्यामुळे व्यापाऱ्यांना केवळ 50-60 रुपये किलो दराने चारोळी विकावी लागते. चारोळी म्हणजे उत्तम प्रतीचा रानमेवा, जो बाजारात महाग किंमतीला मिळतो. हे माहिती असूनही महिलांना आर्थिक नुकसान सोसून पडत्या दराने व्यापाऱ्यांना माल विकावा लागतो.

ही परिस्थिती समजल्यावर GSMT संस्थेनं बचत गटातल्या महिलांशी चर्चा केली. वनोपज आधारित प्रक्रिया व्यवसाय सुरू करण्याची तयारी महिलांनी दर्शवली. 'जय सेवा महिला बचत गटा'ने चारोळी व्यवसाय करण्याचे ठरवले. नंतर गटाने आसपासच्या गावांतल्या चारोळी संकलक महिलांसोबत बैठक घेऊन त्यांच्याकडच्या सर्व चारोळी रास्त दराने विकत घ्यायचे ठरवले. या कोलाम आदिवासी महिला उद्योजक बनण्याच्या दिशेने वाटचाल करू लागल्या!

चारोळी प्रक्रिया व्यवसायासाठी डीकॉल्टीकेटर (चारोळी फोडणी यंत्र) आवश्यक होते. आयआयटी

मुंबईच्या सहकार्याने हे यंत्र तयार करण्यात आले. यामध्ये चारोळीसोबत डाळदेखील तयार करता येते. 2021 मध्ये यंत्र आल्यावर गटातल्या सर्व सदस्यांनी ते कसे चालवायचे हे शिकून घेतले.

दिशा महिला फेडरेशनने गटाला आर्थिक मदत केली. जय सेवा महिला बचत गटाने आसपासच्या गावांतील चारोळी 100 रुपये किलो दराने विकत घेण्यास सुरुवात केली. यापूर्वी कोणत्याही व्यापाऱ्याने एवढा दर दिला नव्हता, त्यामुळे महिलांचा मोठा फायदा झाला.

चारोळी प्रक्रियेमध्ये 1 किलो चारोळीतून 200 ग्रॅम चारोळी बी तयार होते. चार क्विंटल चारोळीवर प्रक्रिया केल्यानंतर 100 किलो चारोळी बी मिळाली. यंत्रामुळे ही प्रक्रिया अवघ्या तीन दिवसात पूर्ण झाली. चारोळी विक्रीसाठी संस्थेनं मदत केली. 1000 ते 1200 रुपये किलो दराने चारोळी विक्री शक्य झाली, ज्यामुळे गटाला 60,000 रुपयांचा निव्वळ नफा झाला.

महिलांचा उत्साह आणि उद्योजकता पाहून मानव विकास विभागाने जिल्हा-तालुका निहाय योजनेअंतर्गत चारोळी प्रक्रिया व्यवसायासाठी 14 लाख रुपये मंजूर केले. रानमेव्याच्या माध्यमातून वागदरा गावातील महिलांनी व्यापारी शोषणाचे दुष्टचक्र थांबवले, आपले उत्पन्न वाढवले आणि सामाजिक-आर्थिक स्तरही उंचावला.

# दानापूरचे हरित परिवर्तन

हिंमत शेलकी

दानापूर हे वर्धा जिल्ह्याच्या करंजा तालुक्यातील सुंदर, हरित गाव. पशुपालन हा इथला मुख्य उद्योग. पण एक वेळ अशी आली की गावात गवताची कमतरता भासू लागली, पशुपालक हवालदील झाले. या समस्येवर त्यांनी कशी मात केली याची ही गोष्ट.

दानापूरच्या शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांसाठी चारा मिळवण्यासाठी विविध प्रयत्न केले. पण पावसानं ओढ दिली. लोकही जुन्या विचारांच्या प्रभावाखाली. परिणामी, पिकांची गुणवत्ता कमी झाली. गावकऱ्यांची आर्थिक स्थिती ढासळू लागली.

या परिस्थितीत गावातील एका युवकाने, हिंमतने हिंमत बांधली. प्रश्नातून मार्ग काढायचे ठरवले. त्याने CPC संस्थेशी संपर्क साधला. नवी विचारसरणी आणि तंत्रज्ञान यांच्या सहाय्याने समस्येवर उपाय शोधता येईल हे त्याला समजले. त्यानुसार त्याने गावात काम करायचे ठरवले.

सुरुवातीला हिंमतने गावकऱ्यांना जैवविविधता समितीच्या माध्यमातून कुरण क्षेत्र गवतयुक्त बनवता येईल, हे समजावून सांगितले. गावकऱ्यांनी ग्रामसभा घेतली आणि ठराव केला. वन विभागाच्या अखत्यारित असलेले 20 हेक्टर कुरणाचे क्षेत्र जैवविविधता समितीच्या माध्यमातून गावाच्या ताब्यात आले. या प्रकल्पाच्या पहिल्याच वर्षी, 20 हेक्टर कुरण क्षेत्रातून 1.5 लाख पेंढी गवत मिळाले.

हिंमतने शेतकऱ्यांना स्थानिक बियाण्यांचा वापर करून नवीन तंत्रज्ञान शिकण्यास प्रेरित केले. त्याशिवाय, गावाजवळ विविध भागांमध्ये बागायती क्षेत्र विकसित करण्याचीही पुढाकार घेतली. या नवीन तंत्रज्ञानामुळे आणि विचारसरणीमुळे शेतकऱ्यांचे जीवनमान बदलले. बागायती तंत्रज्ञानामुळे उत्पादनात वाढ झाली आणि गावकऱ्यांना सुरक्षित व परवडणाऱ्या रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. हिंमतच्या पुढाकारामुळे गावकऱ्यांनी गवताच्या कमतरतेवर मात करत नव्या दिशेने वाटचाल केली. त्यांच्या जीवनशैलीत सकारात्मक बदल घडले, गावाची अर्थव्यवस्था सुधारली आणि लोकांचा आत्मविश्वास वाढला. दानापूर गावाने या हरित परिवर्तनाच्या माध्यमातून आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

# बालहक्कांच्या संरक्षणासाठी सक्रीय संवेदनशील गावकरी आणि अधिकारी

निलेश गाडगे

मारेगाव तालुक्याच्या डोंगराळ भागातील पेंढरी आदिवासी गावातली ही गोष्ट. ही गोष्ट गंभीर आहे. अंधश्रध्दा, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक शोषणामुळे होणाऱ्या समस्यांची आहे.

दुर्गम भागात वसलेलं पेंढरी हे गाव मारेगाव तालुक्यात येतं, तर त्याची ग्रामपंचायत असलेलं सुसरी गाव झरी तालुक्यात येतं. दोन दोन तालुक्यात येणाऱ्या गावाकडे कोणत्याच पंचायत समितीचं लक्ष नाही. इथे ना शासकीय योजना राबवल्या जातात ना शासकीय अधिकारी भेटीला येतात.

2017 मध्ये 'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट'च्या माध्यमातून पेंढरीमध्ये 'बाल संरक्षण प्रकल्प' सुरु झाला. सुरुवातीला मारेगाव तालुक्यातील सर्व आशा आणि अंगणवाडी सेविकांना बाल संरक्षण कायद्याचं प्रशिक्षण दिलं. या प्रशिक्षणात पेंढरीतील अंगणवाडी सेविकेनं गावातली एक गंभीर समस्या सांगितली. दोन अविवाहित मुली गरोदर राहिल्या होत्या. कुमारी माता. या मुलींना न्याय मिळाला पाहिजे, त्यांचं जीवन त्यांना जगता आलं पाहिजे, ही अंगणवाडी सेविकेची भावना होती.

दुसऱ्याच दिवशी संस्थेचे कार्यकर्ते अंगणवाडी सेविकेसह संबंधित मुलींच्या घरी गेले. त्या मुली, त्यांचे पालक दोघेही झाल्या प्रकाराने हबकले होते. कोणीच बोलायला तयार नव्हतं. भाषेची अडचण होती, त्यांच्या मनात भीतीही होती की सांगितलं तर त्यांना आणखी त्रास होईल.

प्रकरण गंभीर असलं तरी नाजूकपणे हाताळणं जरूरी होतं. संस्थेच्या कार्यकर्त्यांनी जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधला. त्यांना घटनेबद्दल माहिती दिली. पालक दडपणाखाली आहेत, त्यामुळे बोलायला घाबरत आहेत, हेही सांगितलं. त्यांची भाषा समजू शकेल असा कोलाम समुदायातील अधिकारी चौकशीसाठी निवडायची विनंती केली. त्यानुसार कोलाम समुदायाचा एक शासकीय अधिकारी पेंढरीला गेला. त्यानं पालकांचा विश्वासात घेतलं आणि संपूर्ण माहिती नीटपणे घेतली.

कायदेशीर प्रक्रियेपणे पहिले पोलिस तक्रार दाखल झाली. शासकीय अधिकारी, संस्थेचे कार्यकर्ते सोबत असल्याने दोन्ही मुली व त्यांचे पालक स्टेशनमध्ये रिपोर्ट दाखल करायला आले. दोघींचं लैंगिक शोषण करणारा व्यक्ती एकच असल्याचे उघड झाले. पोलिसांनी त्या व्यक्तीला पुण्यातून अटक केली.

यानंतर दोन्ही मुलींना महिला आणि बाल विकास विभागाच्या मनोधैर्य योजनेअंतर्गत प्रत्येकी 75,

रुपये निधी दिला. कायदेशीर तक्रार आणि मनोधैर्यच निधीची मदत महत्त्वाची होती. पण दोन्ही मुलींचे प्रश्न एवढ्यानं संपणार नव्हते. त्यांना स्वतःचं आयुष्य जगायचं होतं, जो आघात झाला त्यातून शरीरानं आणि मनानं बाहेर यायचं होतं. त्यासाठीही संस्थेनं साथ दिली. दोन्ही मुलींनी बाळाला जन्म दिला होता, या बालकांना वर्ध्यातील शिशुगृहात दाखल केलं. तिथून त्यांना दत्तक देण्यात आलं. मुलींना मानसिक आधार मिळाल्यानं भविष्याचा विचार करण्याचं बळ आलं. कालांतराने दोन्ही मुलींचे विवाह पार पडले. आयुष्यात आलेल्या संकटांवर मात करून आज त्या आपलं जीवन सन्मानाने जगत आहेत.

# जलसमृद्धीमधून धनसमृद्धीकडे

मोहन जाधव

घाटंजी तालुक्यातील आदिवासी बहुल कोपरा (वन) हे चारही बाजूंनी डोंगराळ जंगलाने वेढलेले गाव. जवळपास मागच्या तीन पिढ्यांपासून वन विभागाच्या परवानगीने वनजमीन कसणारे हे गाव जलसमृद्ध कसे झाले त्याची ही गोष्ट.

कोपरा (वन) गावाची स्थापना 1920 साली वन विभागाने वनमजुरांसाठी केली. वन विभागाने 22 कुटुंबांना पावसाळ्यात उपजीविकेसाठी जमीन दिली, पण ही जमीन अद्यापही वन विभागाच्या मालकीची आहे. त्यामुळे या कुटुंबांना शेतजमिनीत कोणतेही स्थायी सुधारणा करण्याची किंवा जमीन विक्रीची परवानगी नव्हती, ज्यामुळे शेती कोरडवाहू आणि अल्प उत्पन्न देणारी राहिली. गेल्या 10 वर्षांत शासनाच्या विविध जमीन धारणा कायद्यांमुळे शेती जमिनीचे पोट हिस्से झाले असून, हे सर्व भोगवट 2 चे शेतकरी आहेत. सध्या 4 स्वमालकीच्या कुटुंबांसह एकूण 70 कुटुंबे शेती करत आहेत, परंतु शेती क्षेत्र अद्याप सामायिक स्वरूपात आहे.

कोपरा (वन) गावाला सामुदायिक वनहक्क (Community Forest Rights) अंतर्गत 386.50 हेक्टर क्षेत्र प्राप्त झाले आहे. गावातील बहुतेक कुटुंबांचे जीवन जंगलावर अवलंबून आहे. मोह, तेंदूपत्ता संकलन, मध गोळा करणे हे प्रमुख रोजगार आहेत. गावातील उत्पन्न मर्यादित असल्याने अनेक कुटुंबे स्थलांतर करत होती.

कोरोना महामारीच्या काळात, 2020 ते 2022 दरम्यान, ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्टच्या पुढाकाराने गावाचा कायापालट व्हायला सुरुवात झाली. शेतकऱ्यांना जल व मृदा संधारणाचे महत्त्व समजावून दिले. शेती शिवारात जल व मृदसंधारणासाठी अल्प खर्चिक विहिरींचे (Recharge Pit) मॉडेल विकसित करण्यात आले आहे. अशा 10 फूट खोल अल्प खर्चिक विहिरी करण्याचे ठरले. शेतकऱ्यांचा सक्रिय सहभाग घेतला. 2021 मध्ये खोदकाम सुरू झाले आणि 45 आदिवासी अल्पभूधारक शेतकऱ्यांनी विहिरी खोदून घेतल्या. यामुळे कोरडवाहू शेती सिंचनाखाली आली. सिंचन क्षेत्र वाढल्याने शेतकऱ्यांना वर्षातून दोन हंगामात पीक घेता येऊ लागले.

उन्हाळ्यात विहिरींना १० फूटांवर पाणी उपलब्ध होते, त्यामुळे काही शेतकऱ्यांनी रोजगार हमी योजनेअंतर्गत विहिरी 25 ते 30 फूट खोल करून घेतल्या. या सर्व शेतकऱ्यांनी पशुपालन, विविध शासकीय योजनांचा लाभ घेत उत्पन्नात वाढ केली आहे. कोपरा (वन) गाव आता जलसमृद्धीकडून धनसमृद्धीकडे मोठ्या आत्मविश्वासाने पाऊल टाकत आहे.

# सामाजिक काम म्हणजे निरंतर शिकण्याची संधी

**प्रणाली पेटकर**

मी प्रणाली दिलीप पेटकर, पांढरकवडा (ल.) ता. झरी जामणी, जि. यवतमाळ येथील रहिवासी. माझे बालपण केळापूर तालुक्यातील पांढरकवडा शहरात गेले. तिथेच बी.कॉम. पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले. मात्र, भाड्याच्या घरात राहणे परवडत नसल्यामुळे एप्रिल 2021 मध्ये बाबांनी गावाकडे परतण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी कोरोनाचा काळ सुरू होता आणि एमकॉम कुठे करावे, हे समजत नव्हते. तेवढ्यात वणीमधील लोकमान्य टिळक कॉलेजचे नाव कानी आले आणि तिथे मास्टर डिग्रीसाठी प्रवेश घेतला. पेपर घरूनच द्यायचे ठरवले. पण शिक्षणासोबत नोकरी करायचीही इच्छा होती.

नोकरीच्या शोधात असताना मैत्रिणीमार्फत 'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट'बद्दल माहिती मिळाली. यवतमाळ जिल्ह्यातल्या आदिवासी समुदायासोबत आरोग्य, शिक्षण आणि उपजीविकेच्या क्षेत्रात काम करणारी ही संस्था. झरी तालुक्यात संस्थेचा नवीन प्रकल्प सुरू होणार होता, त्यासाठी मी इंटरव्ह्यू दिला. मला कामाचा अनुभव नव्हता, झरी तालुक्याची ओळखही नव्हती, पण नोकरी करायची इच्छा होती. "समुदाय कार्यकर्ता" म्हणून माझी निवड झाली. ही संधी माझ्यासाठी खूप महत्त्वाची होती.

कॉलेज करत असताना सीए होण्याचे स्वप्न बाळगलं होतं. वेळेअभावी ते जमलं नाही. पण म्हणून आयुष्य थांबत नाही. नवी वाट शोधावी लागते. या विचारानं आणि नोकरीतून एक ठराविक उत्पन्न मिळेल म्हणून मी जॉब स्वीकारला. मात्र जसजसं काम सुरू केलं, लोकांना भेटू लागले, त्यांच्याशी बोलू लागले, तशा मला नवनव्या गोष्टी समजू लागल्या. माझी नेतृत्वक्षमता वाढू लागली. लोकांच्या समस्या समजायल्या लागल्या. शासकीय योजनांबाबतचे नकारात्मक विचार बदलू लागले. संस्थेच्या महिला सक्षमीकरण प्रशिक्षणामुळे वेगळी जाणीव निर्माण झाली.

पाहता पाहता वर्ष पूर्ण झालं. कामाच्या दरम्यान मांगुर्ला बु. गावात लोकांना शासकीय योजनांची माहिती दिली होती. सुरुवातीला लोकांचा विरोध होता, पण संस्थेच्या मदतीने दोन लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून दिला. लोकांची मानसिकता बदलू लागली. मला काहीतरी साध्य केल्याचं समाधान मिळालं.

आता उपजीविका प्रकल्पाचे दोन वर्ष पूर्ण झाले आहेत. प्रकल्प संपल्यानंतरही संस्थेनं मला पुढे काम करण्याची संधी दिली. "जंगलावर आधारित उपजीविका सक्षमीकरण" या नवीन प्रकल्पांतर्गत माझ्यावर पाच गावांची जबाबदारी सोपवली.

मला निसर्गाची आधीपासूनच आवड होती. या गावभेटींमुळे माझे निसर्गप्रेम आणखी वाढले. वर्धा बापूकुटी येथे प्रशिक्षणासाठी राहिले होते. तिथे बापूकुटीत फिरताना मला एक फुलपाखरू दिसलं. त्यात मला माझं प्रतिबिंब दिसलं. जसं फुलपाखरू निसर्गात मुक्त विहार करत. क्षणिक आयुष्य असलं तरी या फुलावरून त्या फुलावर जातं. तसं समोर आलेल्या प्रत्येक गोष्टीचा आनंद घेणं, त्यातलं चांगलं घेणं गरजेचं आहे. मीही निसर्गाकडे अधिक बारकाईने पाहायला शिकले.

मी एमकॉम झाले म्हणजे माझं शिक्षण पूर्ण झालं, असं मी मानत होते. पण हे काम करताना लक्षात आलं की माणसाचं शिकणं कधीच थांबत नाही. “शिकाल तर टिकाल” या म्हणीचा अर्थ मला प्रत्यक्षानुभवातून कळला.



# संघर्षातून भरारी

दुलन मरापे

यवतमाळ जिल्ह्यातील वणी रासा गावातील बया उर्फ दुलन. म्हणजे मी. ही माझी कहाणी आहे.

एका आदिवासी कुटुंबात माझा जन्म झाला. माझं बालपण मोठ्या कठीण परिस्थितीत गेलं. क्षयरोगाने आई गेली. शेजारीपाजारी काम करून पोट भरायची वेळ आली. पहिलीला शाळेत गेले, नंतर दोन वर्ष शाळेत खंड पडला. नंतर वडिलांनी मला त्यांच्या बहिणीकडे, माझ्या आत्याकडे पाठवलं. कारण त्या दांपत्याला स्वतःची मुलं नव्हती.

आत्यानं मला मायेनं वाढवलं, शिकवलं. मी १२वी झाले. पण गरिबीमुळे पुढचं शिक्षण घेता आलं नाही. आत्याच्या मदतीने पर्यावरण संस्थेत काम करू लागले. त्यामुळे आर्थिक स्थैर्य मिळालं. 2002 ते 2006 या काळात 'महिला सक्षमीकरण प्रकल्पा'त काम केलं. ज्यात 50 किशोरी मुलींना एचआयव्हीबद्दल जागरूक केलं. प्रशिक्षण दिलं. या प्रशिक्षणात सहभागी असलेल्या दोन मुलींचं शोषण होत असल्याचं लक्षात आलं, त्यांना त्यातून बाहेर पडण्यासाठी सावध केलं, मदत केली.

माझ्या आयुष्यातलं एक वळण म्हणजे माझं लग्न. तेव्हा मी 23 वर्षांची होते. सासरी 17 जणांचं मोठं कुटुंब. घरकामाला जोडून काम करायची इच्छा होती. सुरुवातीला पर्यायी रोजगार शोधण्याचा प्रयत्न केला. पण काही मिळालं नाही. शेवटी गावातल्या शाळेत स्वयंसेवक म्हणून शिकवण्याची संधी मिळाली.

गट स्थापन करत असताना, गावातल्या महिलांकडून भरपूर प्रेम आणि माया मिळाली. 'नातं' या शब्दाचा खरा अर्थ समजला. त्यांनी माझ्या लग्नाच्या वेळी पाहुणे मंडळींच्या सरबराईपासून जेवणापर्यंतची सगळी कामं केली. कारण आत्या एक डोळ्याने अपंग, बाबा बहिरे, आणि मामा खूप वयस्कर. मात्र, सासरकडील मंडळींचा मला खूप आधार मिळाला. सृजन संस्थेच्या माध्यमातून मला 'अंकुर' प्रकल्पात नवजात बाळांच्या काळजीसाठी काम करण्याची संधी मिळाली. लग्नानंतर जेव्हा मी आई झाले, त्याच काळात माझे वडील, सासरे, आत्या, मामा हे सर्व मला सोडले गेले. या दुःखाने खचून न जाता, नवऱ्याच्या पाठिंब्यामुळे मी धीराने पुढे वाटचाल करत राहिले.

संस्थेचं काम संपल्यानंतर औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, झरी येथे एक वर्षाचे शिवणकाम प्रशिक्षण घेतलं. कपडे शिवून आर्थिक हातभार लावू लागले. पुढे पंचायत समितीमध्ये प्रशिक्षक म्हणून निवड

झाली आणि गावागावात गटांना प्रशिक्षण देण्याची संधी मिळाली. गट स्थापन करत असताना, गावातल्या महिलांकडून भरपूर प्रेम आणि माया मिळाली. 'नातं' या शब्दाचा खरा अर्थ समजला.

2017 पासून उमेद अभियानांतर्गत 'पशुसखी' म्हणून तीन वर्षे काम केलं. मात्र, कोरोनामुळे हे काम थांबलं. गावातल्या महिलांची परिस्थिती पाहून त्यांना स्वावलंबी बनवण्याचा मी निश्चय केला. महिलांना बाहेर पडायला प्रोत्साहन दिलं. त्यांना व्यवसायाच्या संधींबाबत मार्गदर्शन केलं.

झरी पंचायत समितीत मोहफूल व्यवसायासंदर्भात महिलांनी मांडणी केली. त्यांना 50,000 रुपयांची मदत मिळाली. यवतमाळ जिल्ह्यातल्या नवउद्योजक म्हणून 2019 मध्ये 2 लाख रुपयांचे बक्षीस मिळाले. मात्र, मालाला भाव मिळाला नाही आणि व्यवसायात तोटा झाला. पुन्हा 'दिलासा' संस्थेच्या मदतीने फिरता निधी व शेती महिला संघ उभा करून दोन लाख रुपयांची मदत मिळवली. अशिक्षित महिलांनी दुसऱ्याच्या आधाराने आपले अनुभव मांडून यश मिळवले, याचा मला अभिमान वाटतो.

समाजासाठी चांगले काम करण्याची माझी इच्छा होती. त्याच वेळी ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्टमध्ये कामाची संधी मिळाली. मी सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समितीच्या बैठकीद्वारे पाच गावांतील लोकांना त्यांच्या हक्कांची माहिती देऊन जागरूक करण्याचे काम आता हाती घेतले आहे. आयुष्यातला संघर्ष, शिक्षण, आणि समाजसेवेचा प्रवास... या सगळ्यातून मला खूप काही शिकायला मिळते आहे.

# उमरगाव अंजानीचा एकतेचा प्रवास

चंदन मलांडे

ही कहाणी आहे यवतमाळ जिल्ह्यातील कळम तालुक्यातील उमरगाव अंजनी या छोट्या गावाची. कोलाम या अनुसूचित जमातीच्या समुदायाचं हे गाव.

गावाची एक स्वतःची वेगळी खास अशी परंपरा आहे. जिचं नाव साती. हा एक उत्सव आहे, जो गावकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा असा आहे. या उत्सवामुळे गावात सुख-शांती नांदते आणि आजारपण येत नाही असं ते मानतात.

गावातले 70-75 वर्षांचे, लांब केसांचे वयोवृद्ध व्यक्तीमत्व म्हणजे 'सुपारी दिय्याम'. गावकऱ्यांच्या मते, त्यांच्या शरीरात देवाचा वास आहे. त्यांच्या मार्गदर्शनानुसार साती उत्सव साजरा केला जातो. सुपारी दिय्याम त्यांच्या हातातील भाल्याने गावाची सीमा आखतात. गावाच्या चारही बाजूंना भीमायाक, वाघाई, चंडिका, काटी, रेणुका माता अशा स्थानिक देवतांच्या दगडी मूर्ती आहेत. त्यांची पूजा उत्सवाच्या वेळी केली जाते. पाच दिवसाचा हा उत्सव असतो.

उत्सवाचे नियम अत्यंत कठोर आहेत. या काळात कोणीही गावाबाहेर जाऊ शकत नाही. बाहेरचा कोणीही गावात येऊ शकत नाही. चप्पल घालता येत नाही. आणि पाण्याचे माठ डोक्यावरून आणावे लागतात. कोणीही नियम तोडला, तर त्याला 500 रुपये दंड आणि पाच चाबकांचे फटके, ही शिक्षा.

पण गावातली एक मोठी समस्या म्हणजे दारू. दारूमुळे गावकऱ्यांत भांडणं वाढली, अपशब्द वापरले गेले आणि दुरावा वाढला. गावकऱ्यांच्या प्रेम, एकता, एकोपा हरवून गेला.

आता माझा या गावाशी कसा संबंध आला ते सांगतो. मी पुण्याहून नुकताच परतलो होतो, नोकरीच्या शोधात होतो. मित्रानं 'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट' संस्थेची माहिती दिली. यवतमाळ जिल्ह्यात उपजीविका आणि पर्यावरण सुरक्षेचं काम करणारी ही संस्था. संस्थेच्या प्रकल्पावर सामूहिक वनहक्काचं काम गावात करायचं होतं, मी ही संधी स्वीकारली. मुलाखतीनंतर मला कैलासपुरी, सोनखास, हेटी, हिवरी पिंपळखुटी, आणि पार्डी या पाच गावांची जबाबदारी मिळाली. पार्डी गावातल्या लोकांमध्ये फारसा सहभाग दिसत नव्हता, म्हणून मी त्याऐवजी उमरगाव अंजनी निवडलं. कारण मला या गावाची पार्श्वभूमी आधीपासून माहिती होती.

16 सप्टेंबर 2023 ला मी पहिल्यांदा उमरगाव अंजनीत पाऊल टाकलं. गावाची माहिती करून घेतली. 354 लोकसंख्येचं गाव पण एकेमकांपासून दुरावलेलं. मी ठरवलं की या लोकांना एकत्र

आणायचं. सुरुवातीला लोक माझ्याशी बोलायलाही तयार नव्हते. मी प्रत्येक घरी जाऊन, त्यांच्या भाषेत संवाद साधू लागलो. हळूहळू लोकांचा विश्वास जिंकला.

मग मी प्रकल्पाबद्दल गावकऱ्यांना माहिती देऊ लागलो. मला आठवतंय पहिल्या बैठकीला केवळ पाच लोक आले होते. थोडं वाईट वाटले, पण मनात म्हणालो की सुरुवात मोठ्याची सुरुवात छोट्या गोष्टींपासून होते. 'थेंबे थेंबे तळे साचे!' मी खचलो नाही. हार मानली नाही. अधिक मेहनत घेतली. सतत आजीविका आणि पर्यावरण सुरक्षा प्रकल्पाची माहिती, अभिलेख पत्र स्पष्टता 3 व 4, त्यांचे क्षेत्र 355.86 हेक्टर, त्यांचे हक्क इत्यादी माहिती त्यांना वारंवार सोप्या भाषेत सांगत राहिलो. हळूहळू लोकांची उत्सुकता वाढली. त्यांनी कामात रस दाखवायला सुरुवात केली. तरीही, गावातील निम्मेच लोक येत होते. त्याची धास्ती मनात होतीच. पण 'भगवान के घर देर, अंधेर नही,' म्हणतात ते अगदी खरं आहे. मलाही त्याचा अनुभव आलाच.

त्या दिवशी 'आर्थिक सहाय्य योजने'ची माहिती द्यायची होती. सर्व गावकऱ्यांना एकत्र येण्याचं आवाहन केलं होतं. त्या दिवशी, लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळे लोक चावडीवर जमले. तो दृश्य पाहून माझ्या आनंदाला पारावार उरला नाही. अनुसूचित जमातीतील (कोलाम समाजातील) लोकांना एकत्र आणण्याचं माझं उद्दिष्ट पूर्ण होतंय, असं मला त्या दिवशी वाटलं. मला उमजलं की आपले प्रयत्न हीच सफलतेची खूण असते. ते निरंतर करत राहण्याची खूणगाठ मी त्या दिवशी बांधली.

# एकल महिलांची एकजूट

**अंतरा ठोंबरे**

डोंगराळ भागात वसलेलं दत्तपूर हे एक आदिवासीबहुल गाव. गावातले काही युवक शिकले असले तरी बहुसंख्य लोक अल्पशिक्षित आहेत. शेती आणि रोजंदारी हीच उपजिविकेची मुख्य साधनं. त्यातही मनिषाताईंसारख्या एकल, स्वतःच्या जीवावर घर चालवणाऱ्या महिलांची स्थिती तर आणखीनच बिकट. साधी शासकीय योजनांची माहिती व मदतही त्यांच्यापर्यंत पोहोचत नव्हती.

या परिस्थितीत 'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट' संस्थेने पुढाकार घेतला. सम्यक प्रकल्पाच्या माध्यमातून गावकऱ्यांपर्यंत शासकीय योजनांची माहिती पोहोचवण्याचे काम सुरू झाले. त्याच दरम्यान मनिषा वाघाडेंची भेट झाली. मनिषाताईंची परिस्थिती अतिशय हलाखीची. पतीच्या निधन झाल्यापासून घरचा भार त्या एकटीनं पेलत होत्या. नुसत्या मजुरीकामातून अशी कितीशी कमाई होणार? तुटपुंज्या कमाईत घरचं भागत नव्हतं. मुलांची शिक्षणही अपूर्ण राहिली होती.

पण आपली परिस्थिती बदलायची ही त्यांची धडपड होती. संस्थेच्या बैठकीत मनिषाताई स्वखुशीनं आणि उत्साहानं सहभागी झाल्या. शासकीय योजनांची माहिती त्यांना जाणून घेतली. संजय गांधी निराधार योजना कशी मिळवायची, त्यासाठी कोणती कागदपत्रं लागतात सगळे तपशील समजून घेतले. आपल्या समजलेल्या गोष्टींचा उपयोग स्वतःपुरता न ठेवता इतर महिलांनाही योजनांची माहिती दिली. कार्यकर्त्यांच्या मदतीने आवश्यक कागदपत्रं गोळा करून शासकीय कार्यालयात सादर केली.

मनिषाताईंना संजय गांधी निराधार योजना मंजूर झाली. दरमहा 1500 रुपये मिळू लागले. त्याचा त्यांना थोडा आधार झाला. आर्थिक तंगी कमी झाली. आता स्वरोजगार सुरू करण्याचा आत्मविश्वास त्यांना आला. मुलांच्या शिक्षणाची गाडीही त्यांनी रूळावर आणली.

त्यांना मिळणारा योजनेचा लाभ लहानसाच आहे. पण तो त्यांचं बळ वाढवणारा आहे. मनिषा ताई म्हणाल्या, "पोट भरण्याचंही साधन नव्हतं, आणि नवऱ्याच्या जाण्यानं माझं आयुष्य एकदम कोलमडून गेलेलं. लेकरांचं भवितव्य अंधारात गेलं. पण आता मात्र 'फुल न फुलाची पाकळी' या म्हणीप्रमाणे थोड्याफार मदतीने आम्ही हळूहळू उभं राहत आहोत. माझ्या पोटच्या गोळ्यांची स्वप्नं पूर्ण करण्यासाठी मी आता कधीही थांबणार नाही."

मनिषाताईंच्या प्रेरणेमुळं गावातल्या इतर महिलांही शासकीय योजनांचा लाभ घ्यायला पुढे येत आहेत. त्यांना स्वावलंबी व्हायचे आहे आणि आपले जीवन सुधारायचे आहे. हा लांब पल्ल्याचा प्रवास एकजुटीने आणि एकमेकींच्या साथीने करायचा त्यांचा निर्धार आहे.

# मजुरांचे पलायन रोखणारी रोजगार हमी

पंकज किनाके

यवतमाळ जिल्ह्यातल्या केळापूर तालुक्यातील डोंगराळ भागात वसलेलं महांडोळी हे गुलाब आत्रामचं गाव. गुलाबच्या कुटुंबात त्याची पत्नी आणि दोन लहान मुलं. रोजंदारी हाच त्यांच्या उपजीविकेचा मुख्य आधार. गुलाब आणि त्याची पत्नी दोघांची कष्टाची तयारी होती, पण गावात कामं मिळायची मारामार. कमाईसाठी बाहेरगावी जाणं भाग होतं. गुलाबसारखे रोजगाराच्या शोधात असलेले आणखी 30 मजूर गावात होते, सगळ्यांना दरवर्षी सक्तीचं स्थलांतर करावं लागत होतं.

जुलै 2023 मध्ये 'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट'नं शाश्वत उपजिविका व पर्यावरणीय सुरक्षेच्या कामाला महांडोळीतल्या लोकांच्या भेटीगाठी घेऊन सुरुवात केली. तेव्हा कार्यकर्त्यांची आणि गुलाबची पहिल्यांदा भेट झाली. त्यानं गावात काम नसल्याची समस्या सांगितली. "रोजगार हमीबद्दल ऐकलंय का?" कार्यकर्त्यांनी विचारलं. गुलाबला आणि गावातल्या कुणालाच त्याची माहिती नसल्याचं समजलं. काही जणांकडे जॉब कार्ड होती, पण गुलाबकडे आणि आणखी 20 जणांकडे जॉब कार्ड नव्हतं. लोकांना उपलब्ध शासकीय योजनांचा लाभही मिळत नव्हता.

नंतर गावात बैठकांची मालिका सुरू झाली. संस्थेनं लोकांच्या समस्या समजून घेतल्या. त्यांना रोजगार हमीची सविस्तर माहिती दिली. जॉब कार्ड काढण्यासाठी मार्गदर्शन आणि सहकार्य केलं. लवकरच, गुलाब आत्रामसह गावातल्या बाकीजणांची जॉब कार्ड तयार झाली.

लोकांच्या मनात पुढचा प्रश्न आला. "आता जॉब कार्ड झालं, पण काम कुठे मिळेल?"

महांडोळी गावाला सामूहिक वनहक्क क्षेत्र मिळालं आहे. हे माहिती झाल्याने संस्थेच्या कार्यकर्त्यांनी गावच्या सरपंचांची भेट घेऊन या वनक्षेत्रात कामासाठी रोजगाराची मागणीची कल्पना मांडली. मजुरांच्या हस्ते लहिला काम मागणी अर्ज ग्रामपंचायतीला सादर झाला. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाला. रोजगार हमीअंतर्गत विहिरींच्या कामाची मंजुरी मिळाली. विहीर खोदाईच्या कामात अनेक मजुरांना गावातल्या गावात रोजगार मिळाला.

त्यानंतर कामांची मालिका चालू राहिली. संस्थेनं लोकांना बाकी शासकीय योजनांबद्दल माहिती सांगितली. ही माहिती नसल्यानं आपलं किती नुकसान झालं ही जाणीव गावकऱ्यांना झाली. त्यांच्या सक्रियतेमुळं झालेलं नुकसान हळूहळू भरून निघू लागलं.

स्थानिक रोजगार मिळाल्यामुळे बाहेरगावी जाऊन मजुरीची गरज भासेनाशी झाली. स्थलांतराची

समस्या कमी झाली आणि कुटुंबातील सदस्यांना आपापल्या घरी राहून कामं करता यायला लागली.

"आमच्या गावात याआधीही शासकीय अधिकारी यायचे, पण त्यांनी कधी रोजगार हमीबद्दल सांगितलं नाही," गुलाब आत्रामनं सांगितलं. संस्थेमुळं त्यांना ही माहिती मिळाली. "संस्थेनं आम्हाला चांगलं मार्गदर्शन करून काम मिळवून दिलं. मला मी माझ्या कुटुंबासोबत आहे आणि मुलांच्या शिक्षणाकडेही लक्ष देऊ शकतो."

गुलाबसारखेच अनेक मजुरांचे जीवन बदलत आहे. गावकऱ्यांना काम मिळाला. त्यांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावला. योग्य मार्गदर्शन आणि शासकीय योजनांचा लाभ मिळाला तर गावकऱ्यांचं जीवनमान कसं बदलतं याचं जिवंत उदाहरण महांडोळी गावात बघायला मिळतं. शकते.

# समूह बांधणी महिलांची, पाऊलवाट आत्मनिर्भरतेची

अर्चना तुरे

यवतमाळ जिल्ह्यातलं एक दुर्गम आणि आदिवासी गाव रोहाटेक. कविता भोयर ही संघर्षशील महिला याच गावात राहते.

145 कुटुंबांच्या या गावात कोलाम आदिवासींची 70 कुटुंबं आहेत. त्यातलं एक कविताचं. कविताला दोन मुली. गावकऱ्यांची परिस्थिती खूप बिकट. हाताला काम मिळालं तर खायला मिळायचं, नाहीतर उपाशीपोटी झोपायची वेळ यायची. या भोयर कुटुंबाची अवस्थाही अशीच होती.

‘ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट संस्थे’नं गावात काम सुरू केलं. समाजकार्याची आवड असलेल्या कविता नियमितपणे बैठकीला यायची. सगळी माहिती समजून घ्यायची. तिला समजलेलं बाकी महिलांना समजून सांगायची. रोजगार व बचतीचं महत्त्व तिला पटलं. तिनं बाकीजणींना सांगायला सुरुवात केली. घरोघरी जाऊन महिलांना बचत गटांसाठी प्रेरित केलं. सगळ्यांची एकत्र बैठक घेऊन त्यांना पुन्हा त्याचं महत्त्व सांगितलं. पन्नासहून अधिक महिला त्यावेळी जमल्या होत्या. त्यावेळी गावात एकही बचत गट नव्हता.

“आपणच सुरुवात करूया!” असं सांगत कवितानं महिलांना एकत्र आणलं. तिच्या प्रयत्नांना यश आलं. 90 आदिवासी महिला होत्या, त्यापैकी 50 जणींनी गट करायला तयारी दाखवली. त्यांचे 5 बचत गट तयार करण्यात आले.

गट तयार करण्याच्या प्रक्रियेत अनेक अडचणी आल्या. या कोलाम महिलांकडे आपल्या ओळखीची कागदपत्रं नव्हती. कवितानं ग्राम पंचायतच्या मदतीनं कॅम्प आयोजित केला. त्यात 30 महिलांना आधार कार्ड आणि पॅन कार्ड मिळालं. मग गट तयार झाले आणि माविमशी (महिला आर्थिक विकास महामंडळ) जोडले गेले.

4 ऑक्टोबर 2022 हा गटांचा स्थापना दिवस. त्यापासून 6 महिने गटांचे कामकाज सुरळीतपणे चालवण्याची जबाबदारी कविताने सांभाळली. गटांना अजून कोणती आर्थिक मदत मिळायची होती. तिच्या कामानं प्रभावित होऊन सरपंच आणि इतर महिलांनी तिला ‘सामुदायिक संसाधन व्यक्ती’ म्हणून पद स्वीकारण्याचा आग्रह केला. कविताने ही जबाबदारी स्वीकारली. त्याचे 1000 रूपये मानधन तिला मिळू लागले.

आता कविताचे काम आणखी जोमात सुरू झाले. तिने महिलांना विविध शासकीय योजनांशी

जोडले. त्यांना कर्ज उपलब्ध करून दिले. तिच्या मदतीने 4 महिलांनी शेळीपालन व्यवसाय सुरू केला. गटातल्या 10 महिलांच्या मुलांसाठी शिकवणी वर्ग घेऊन ती त्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत करत आहे. समूह बांधणीच्या माध्यमातून कविताला एक नवी वाट सापडली.

"आमच्याकडे पोट भरण्याचं साधनही नव्हतं. नवऱ्यानेही मधेच आयुष्याची दोरी सोडली. मुलींच्या भविष्याची मला खूप चिंता वाटायची," कविता सांगत होती. मिळालेल्या संधीमुळे ती आत्मनिर्भर झाली. "माझ्या मुलींची स्वप्नं पूर्ण करण्याचा मी प्रयत्न करत राहणार," ती आत्मविश्वासानं सांगते.

कविताची ही संघर्षमय वाटचाल केवळ तिच्या कुटुंबापुरती मर्यादित राहिली नाही, तिनं रोहाटेक गावातल्या महिलांमध्ये स्वावलंबनाचे बीज रोवलं आहे. संकटांना सामोरे जाण्याची हिंमत आणि परिवर्तनाची जिद्द या बळावर तिची वाटचाल चालू आहे. आता महिलांची 'उत्पादक कंपनी' स्थापन करणं हे तिचं पुढचं ध्येय आहे.

# नैसर्गिक शेतीची कास धरणारा देविदास

आकाश मेश्राम

यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर तालुक्यातल्या गावात शेतकऱ्यांनी रासायनिक शेतीचा धोपटमार्ग सोडून नैसर्गिक शेतीची कास धरली आहे. यात पुढाकार घेणारा एक शेतकरी देविदास सुरपाम, त्याचीच ही गोष्ट.

'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट संस्थे'नं शाश्वत उपजीविका व पर्यावरण सुरक्षा प्रकल्पांतर्गत नैसर्गिक शेतीचा प्रसार सुरू केला. गावात जनजागृती बैठका घेतल्या. सुरुवातीला कोणत्याच शेतकऱ्यांनी या कल्पनेला प्रतिसाद दिला नाही. मात्र दोन दिवसांनी देविदास सुरपामनं फोन केला 'नैसर्गिक शेती करायची माझी तयारी आहे' असं त्यानं सांगितलं.

जुलै 2023 पासून देविदासच्या शेतात नैसर्गिक शेतीला सुरुवात झाली. त्यांनं आपल्या 5 एकर जमिनीपैकी 1 एकर क्षेत्र प्रयोगासाठी निवडलं. संस्थेनं त्याला जमिनीचं योग्य नियोजन कसं करायचं हे समजावलं. त्यानंतर नैसर्गिक बीजामृत, बीज प्रक्रिया, कंपोस्ट खत, दशपर्णी अर्क, आणि जीवामृत यांसारख्या नैसर्गिक पद्धतींचा अवलंब शिकून घेतला.

नैसर्गिक शेतीला सुरुवात केल्यावर, प्रयोगाच्या सुरुवातीला 10 ते 12 हजार रुपये खर्च आला. नंतर जमिनीचा कस वाढला तसा हा खर्च हळूहळू खर्च कमी होत 2 ते 3 हजार रुपयांपर्यंत आला. लागवडीचा खर्च कमी झाला, पैसे वाचले. रासायनिक शेतीच्या तुलनेत हा अनुभव देविदाससाठी वेगळा होता. खर्च कमी झाल्यानं त्याची जवळपास 10 हजार रुपयांची बचत झाली.

उत्पन्नातही फरक दिसून आला. रासायनिक शेती करताना एकरी 5-7 क्विंटल कापसाचे उत्पादन मिळायचे. नैसर्गिक शेतीत कमी खर्चात तितकंच उत्पादन त्याला मिळालं. या अनुभवानं त्याचा नैसर्गिक शेतीवर विश्वास बसला. 'पुढच्या वर्षी संपूर्ण 5 एकर क्षेत्रात नैसर्गिक शेती करायची' असं त्यानं ठरवलं.

देविदास सुरपाम यांच्या यश पाहून गावातले इतर शेतकरी देखील नैसर्गिक शेतीकडे वळू लागले. हा चांगला बदल आहे. कारण नैसर्गिक शेती केवळ पर्यावरणपूरकच नाही, तर आर्थिकदृष्ट्याही फायदेशीर आहे. शेतीच्या लागवडीचा खर्च कमी करून उत्पन्न वाढण्यास मदत करणारी आहे.



# आपल्या नृत्यकौशल्यातून नवी झेप घेणाऱ्या पारलिंगी संजयची गोष्ट

अंकज अबाले

आपली ओळख प्रत्येक व्यक्तीसाठी महत्त्वाची असते. स्त्री अथवा पुरुष ही जन्माने मिळणारी ओळख. पण काहीजणांची ओळख त्यापेक्षा वेगळी असू शकते, हे बऱ्याचजणांना माहिती नसते. या वेगळेपणामुळं त्यांचं जगणं किती कठीण होऊन जातं, हे संजयच्या जीवनातून समजतं.

यवतमाळ जिल्ह्यातल्या पुसदमधला संजय त्याच्या आई-वडिलांसोबत, भाऊ-बहिणीसोबत राहायचा. आई-वडील शालेय शिक्षक. संजयही भावंडांसोबत शाळा शिकायचा. मात्र पाचव्या इयत्तेपासून संजयला आपलं वेगळेपण जाणवायला लागलं. तो दिसायला इतरांसारखा मुलगा होता, पण त्याचं वागणं-बोलणं, स्वभाव मुलींसारखा होता. त्याचं शरीर वरून पुरुषासारखं दिसत असलं तरी त्याला आतून आपण पुरुष नाही तर आहोत असं वाटायचं. स्त्री व पुरुषाच्या पलिकडच्या या लिंग ओळखीला पारलिंगी अथवा ट्रान्सजेंडर म्हणतात.

स्वतःची ही वेगळी ओळख समजणं संजयसाठीही कठीण होतं. त्याच्या 'वेगळ्या' वागण्यामुळं त्याला चिडवाचिडवीला तोंड द्यावं लागे. समाजाच्या नकारात्मक दृष्टिकोन त्याच्या मानसिक गोंधळात भर घालत होता. शाळेतली इतर मुलं संजयच्या वेगळ्या वागण्यामुळे त्याची थट्टामस्करी करायचे. सुरुवातीला संजयनं दुर्लक्ष केलं. पण टिंगलटवाळी आणि वाईट वागणुकीचा दररोजच सामना करावा लागत होता. तरीही बारावीपर्यंतचं शिक्षण त्यानं कसंबसं पूर्ण केलं.

ना शाळेत कुणी समजून घेणारं, ना घरी. संजयच्या ओळखीची चर्चा हळूहळू शाळेच्या बाहेर, शेजारी-पाजारी आणि नातेवाईकांपर्यंत पोहोचली. त्याचे आई-वडीलही समाजाच्या दबावामुळे त्रस्त होते. कारण लोक संजयबरोबरच त्याच्या कुटुंबालाही नावं ठेवायचे. बाहेरच्या जगातून असं वेगळं टाकलं जात होतं तेव्हा संजयला घरच्यांच्या आधाराची सर्वाधिक गरज होती. पण कुटुंबानंही समजून घेतलं नाही. उलट त्याला घराबाहेर काढलं.

अशा कठीण वेळी संजयची भेट 'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट'चा कार्यकर्ता श्रीधरशी झाली. श्रीधर स्वतः पारलिंगी असून संस्थेच्या मदतीने आपल्यासारख्या लोकांसाठी काम करतो. त्यांनी संजयला संस्थेत आणलं. संस्थेतील समुपदेशकांनी संजयशी बातचीत केली. त्याला स्वतःची ओळख समजून घ्यायला आणि ती स्वीकारायला मदत केली.

घरातून बाहेर पडल्यावर संजयला स्वतःच्या पायावर उभं राहणं भाग होतं. श्रीधरने संजयचा

नृत्याचा छंद ओळखला होता. याच कौशल्याच्या आधारे स्वतःचं भविष्य घडवावं असं त्यानं संजयला सुचवलं. संजयला मुंबईला जाऊन डान्स अकादमी जॉइन करण्याची मदत केली. संस्थेच्या धर्मेश सरांनी प्रवेशासाठी मदत केली. संस्थेनं आणि पारलिंगी समुदायातील त्याच्या मित्रांनी संजयला आर्थिक मदत केली आणि पुढे जाण्यासाठी प्रोत्साहित केलं. त्याला मानसिक आधार मिळाला. संजयनंही खूप मेहनत घेतली आणि आपली कला प्रगल्भ केली.

प्रशिक्षण पूर्ण करून संजय पुसदला परतला. एका इंटरनॅशनल स्कूलमध्ये कोरिओग्राफर म्हणून कामाची संधी मिळाली. हळूहळू लोक त्याला कलाकार म्हणून ओळखू लागले. त्याची उपजीविकाही स्थिर झाली. संजयने थोडी थोडी बचत करून स्वतःची डान्स अकादमी सुरू केली - "स्काय डान्स अकादमी". आज या अकादमीत 400 हून अधिक विद्यार्थी नृत्य शिकत आहेत.

संजयने आपल्या नृत्यकौशल्यामुळे एक वेगळीच उंची गाठली. पारलिंगी असणे ही स्त्री, पुरुष यासारखीच जन्माने मिळालेली एक ओळख असते. पण आपण आपली खरी ओळख आपल्या कौशल्याने आणि मेहनतीने निर्माण करू शकतो, हे संजयने दाखवून दिले आहे. त्याच्या नृत्य अकादमीत येणारे विद्यार्थी त्याच्यासारखं नृत्यकौशल्य संपादन करण्याचं स्वप्न पाहतात. त्याचं पारलिंगी असणं त्यांनीही सहजपणे स्वीकारलंय आणि ते शिकण्याच्या आड येत नाही. संजय पारलिंगी आहे म्हणून वेगळा नाही, आपल्यातल्याच आहे, माणूसच आहे.

# आर्थिक स्वावलंबनातून आत्मविश्वास उंचावला

सुनिता सातपुते

यवतमाळ जिल्ह्यातल्या मारेगाव तालुक्यातले डोंगरात वसलेले कोलाम समुदायाचे वागदरा गाव. शेती आणि वनोपज गोळा करणे हा इथल्या लोकांचा मुख्य रोजगार. गावाला 255.77 हेक्टर सामुदायिक वनहक्क प्राप्त झाल्यानं वनोपज खरेदी-विक्रीचा अधिकार मिळालेला आहे.

'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट'नं गावात सम्यक प्रकल्प सुरू केला. गावातल्या महिला अतिशय साध्या आणि मनमिळाऊ. सगळ्याजणी बैठकीला आल्या, बोलल्या, पण समूह बांधणीसाठी कोणीच तयार होईना. सतत त्यांना भेटून त्यांचा विश्वास जिंकला. त्यांना बचतीचे महत्व समजावून सांगितले. महिलांना आर्थिक स्वावलंबनाची जाणीवेचं बीज पेरलं. त्यांच्यात स्वतंत्र व्यवसाय करण्याची उमेद निर्माण झाली.

समूह बांधणीनंतर पहिल्याच वर्षी महिलांनी 'मोह बँक' तयार केली. मोहफळ गोळा करायचं काम तर त्या करायच्याच. त्याचं व्यवसायात रूपांतर करायचं कौशल्य त्यांनी आत्मसात केलं. या यशस्वी सुरुवातीनंतर, दुसऱ्या वर्षी त्यांनी मोहफळाची साठवणूक आणि विक्री कशी करायची हे शिकून घेतलं. व्यापाऱ्यांशी थेट घेत संवाद साधला. आपला माल कसा चांगला आहे, हे पटवून देण्यात त्या यशस्वी झाल्या. त्यांना हवा तसा चांगला भाव मिळाला, त्यातून चांगला आर्थिक लाभ झाला.

महिला गटाच्या या यशामुळे इतर महिलाही प्रेरित झाल्या. गावात 5 नवीन बचत गट तयार झाले. मोहफळ, डिंक, चारोळी यासारख्या वनोपजावर आधारित विविध व्यवसाय महिलांनी सुरू केले. अनुभवातून त्यांचं कौशल्य आणि व्यावसायिक दृष्टिकोन तावून सुलाखून निघाला. त्यांच्या कार्यक्षमतेमुळे गावातल्या तीन गटांचे 30 लाखांचे प्रस्ताव मंजूर झाले.

यश मिळवताना अडचणींचा सामनाही करावा लागला. उदाहरणार्थ, योजना राबवण्यासाठी 10% निधी आवश्यक होता, त्याची अडचण निर्माण झाली. या निधीसाठी ग्रामपंचायत आणि सरपंचांना विचारणा केली. त्यांनी मदत केली आणि गटविकास अधिकाऱ्याशी चर्चा केली. त्यांनी मानव विकास निधीमधून आवश्यक निधी मिळवून गटांना दिला. निधी तर मिळालाच, शिवाय शासकीय विभागांशी समन्वयानं काम कसं करायचं याचा प्रत्यक्षानुभवही महिलांना आला.

या प्रक्रियेत ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्टचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. संस्थेच्या मदतीने महिलांनी केवळ आर्थिक स्वावलंबनच मिळवलं नाही, तर त्यांचा स्वतःवरचा विश्वास वाढला. "आम्ही स्वतःच्या पायावर उभे राहू शकतो, आणि आमच्या कुटुंबाला आर्थिक स्थैर्य देऊ शकतो," ही जाणीव त्यांच्या मनामध्ये कायमस्वरूपी रूजली.

# चूल आणि मूल यापलिकडे स्वत:ची ओळख घडवणारी सक्षम सुवर्णा

प्रिया ज. लक्षणे

यवतमाळ जिल्ह्यातल्या बाभुळगाव तालुक्यातील आसेगावदेवी गावातल्या सुवर्णाची ही गोष्ट. पुसद तालुक्यातल्या एका छोट्या खेडेगावात तिचा जन्म झाला. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची. परंतु सुवर्णाला शिक्षणाची प्रचंड आवड. तिने बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण केलं. त्यानंतर गरिबीमुळं पुढं शिकता आलं नाही.

लहानपणापासूनच समाजसेवेची आवड असलेली सुवर्णा नेहमी लोकांच्या मदतीसाठी पुढे असते. अगदी लहानपणापासून. वयाच्या अवघ्या १२व्या वर्षी तिनं एका गरीब महिलेला तिच्या पतीच्या मारहाणीतून वाचवलं. त्यामुळे गावात तिच्या धाडसाची चर्चा झाली. मात्र घरच्यांना हे सगळं मान्य नव्हतं. समाजाच्या दबावामुळे तिचं लग्न लावून दिलं.

लग्नानंतरही नोकरी करण्याची तिची इच्छा होती. पण सासरकडून पाठिंबा नव्हता. मग ती संसारात रमली. तिला दोन मुली झाल्या. "चूल आणि मूल सांभाळणं हाच स्त्रीचा धर्म" हाच समाजाचा मानस. पण बाईनं स्वत:चादेखील विचार केला पाहिजे असं तिला वाटायचं. सुवर्णाची स्वप्न वेगळी होती, ती पूर्ण करावी असं तिला वाटू लागलं.

याच सुमारास तिचं आयुष्य पालटून टाकणारी दु:खद घटना घडली. एका अपघातात तिच्या पतीचं अचानक निधन झालं. आयुष्याचा साथी आणि आधार हरवला. तिच्यासमोर दोन लहान मुलींचं पालनपोषण, शिक्षण आणि स्वतःचं अस्तित्व टिकवण्याचं मोठं आव्हान उभं ठाकलं होतं. स्वतःच्या इच्छा मागे टाकून मुलींसाठी आधी जगायचा निर्णय तिनं घेतला. 2016 मध्ये तिनं गावात कामाची शोधाशोध सुरु केली.

तिच्या कामाच्या ठिकाणी सोबत पुरुष होते. त्यावरून परंतु गावातले लोक तिला टोमणे मारू लागले. "घर चालवायचं काम पुरुषांचं. बाईनं मर्यादेत राहून काम करायला पाहिजे. पुरुषांसोबत कशा काम करते, इतर महिलांना सोबत जाऊन काम करायला हवं....." सगळे काही ना काही बोलायचे. तिच्या कानावर सगळं यायचं. पण कोणाच्या टीकेला न जुमानता, स्वतःवर विश्वास ठेवून तिने स्वतःला मजबूत बनवलं. काम सुरूच ठेवलं. पण लोकांचे शब्दाचे घाव तिचं मन घायाळ करत होते.

2022 मध्ये, गावात ;ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट' संस्थेचं काम सुरू झालं. संस्थेच्या महिला सबलीकरण प्रशिक्षणामध्ये सुवर्णाही सहभागी झाली. इथ तिला नवी प्रेरणा, आशा आणि आत्मविश्वास

मिळाला. तिनं गावातल्या इतर एकल महिलांसोबत, दिव्यांग आणि पारधी समाजातील लोकांसोबत काम सुरू केलं. त्यांना माहिती देत शासकीय योजनांशी जोडण्याचं काम सुरू केलं.

तिच्या या कामामुळे गावातले लोक तिला ग्रामपंचायत बैठकींमध्ये आवर्जून बोलवू लागले. गावात कोणताही सरकारी अधिकारी आला की, निर्णय घेण्याआधी सरपंच आणि ग्रामसेवक तिला आवर्जून बोलावू लागले. अनेक दुर्लक्षित पारधी लोकांना तिनं शासकीय योजना मिळवून दिल्या. त्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारले आहे.

स्वतःच्या जिद्दीवर आणि संस्थेच्या मदतीने, सुवर्णाने लोकांचे जीवन सुधारले आणि स्वतःच्या आयुष्यातही आशेचा किरण निर्माण केला. आता ती मनानं खंबीर झाली आहे. स्वतःच्या पायावर उभी राहिली आहे. ‘चूल आणि मूल यापलिकडे बरंच काही करण्याची क्षमता आम्हा महिलांमध्ये आहे,” हे तिनं गावाला तिच्या कृतीतून दाखवून दिलं आहे.

# समाजाच्या सहकार्यानेच बालविवाह-मुक्त भारत शक्य!

संकेश नामपेल्लीवार

बाळाला जन्म देणं आणि आई होणं हा किती सुंदर अनुभव आहे! पण एखाद्या 14 वर्षीय मुलीला त्या अनुभवात ढकलणं अजिबात योग्य नाही.

ही घटना आहे महाराष्ट्रातल्या यवतमाळ जिल्ह्यातल्या एका गावातली. तिथल्या एका कुटुंबानं त्यांच्या अवघ्या 13 वर्षांच्या मुलीचं लग्न तिच्यापेक्षा 10 वर्षांनी मोठ्या मुलासोबत लावून दिलं. अर्थातच गुपचूप. कारण बालविवाह बेकायदेशीर आहे हे सर्वांना माहिती आहे.

या कुटुंबात वडिलांचं निधन झालेलं, मुलीची विधवा आई मोलमजुरी करून घर चालवायची. आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. शिवाय अज्ञान आणि मुलीच्या सुरक्षेची काळजी. त्यांनी घाईगडबडीत मुलीचं लग्न तिच्याच एका नातेवाईकाशी लावून दिलं.

लग्नानंतर काही महिन्यांतच मुलगी गर्भवती झाली. घरच्यांसाठी हा आनंदाचा क्षण होता. पण मुलीच्या आरोग्यासाठी काळजीची गोष्ट होती. घरचे तिची काळजी घ्यायचे. काही दिवसांनी चेकअपसाठी सासू तिला डॉक्टरकडे घेऊन गेली. मुलगी अल्पवयीन असल्याचं डॉक्टरांच्या लक्षात आलं. या गर्भधारणेमुळे तिच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो याची जाणीव त्यांना होती, तसंच कायद्याचं ज्ञानही होतं. डॉक्टरांनी त्वरित पोलिसांशी संपर्क साधला. आणि हा बालविवाह सर्वांसमोर आला.

अशीच आणखी एक घटना पांढरकवडा तालुक्यात घडली. मुलाचं वय 19 होतं, मुलगी सज्ञान होती. योग्य वेळी पोलिसांच्या मदतीने हेही लग्न रोखण्यात यश मिळालं. पण असं ऐनवेळी लग्न रोखण्यापेक्षा समाजानं बालविवाहाचे गंभीर परिणाम समजून घेऊन आपणहून ते रोखले पाहिजेत. बालविवाहामुळे मुलींचं लैंगिक शोषण होतं. कुपोषण आणि तरुण वयातील गर्भधारणेमुळे मातृत्वाच्या वेळी धोका होऊ शकतो आणि बाळाच्या आरोग्यावरही परिणाम होतो. दूरगामी परिणाम आहेत हे सगळे.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणामध्ये (NFHS-5) 20 ते 24 वयोगटातल्या 23.3% मुलींची लग्नं त्यांच्या 18 वर्षांपूर्वीच झाल्याचं आढळलं. यवतमाळ जिल्ह्यात हा आकडा 11.7% इतका मोठा होता. 2030 पर्यंत भारताला बालविवाह मुक्त करण्याच्या उद्देशाने संपूर्ण देशभरात "बालविवाह मुक्त भारत" अभियान राबवले जात आहे. या अभियानांतर्गत जिथे बालविवाहाचे प्रमाण जास्त आहे अशा ३००हून अधिक जिल्ह्यांमध्ये काम सुरू आहे. ज्यात 160 हून अधिक स्वयंसेवी संस्थांचा सहभाग आहे.

यवतमाळ जिल्ह्यात 'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट' आणि 'कैलाश सत्यार्थी चिल्ड्रेन्स फाउंडेशन' मिळून 'बालविवाह मुक्त यवतमाळ' हे अभियान राबवत आहेत. या कामातून गेल्या जून ते ऑगस्ट 2023 या तीन महिन्यांत 12 बालविवाह रोखण्यात यश मिळालं. 70 गावांनी ग्रामसभेत 'बालविवाह मुक्त गाव' म्हणून ठराव संमत केले. 150 गावांमध्ये किशोरींशी संवाद साधून बालविवाहाचे दुष्परिणाम समजावून सांगण्यात आले. याखेरीज विविध माध्यमांतून जनजागृती साधत अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जात आहे.

बालविवाह रोखण्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीने पुढाकार घेणं आवश्यक आहे. आपल्या गावात, आपल्या परिसरात कुठेही बालविवाह होऊ नये यासाठी आपणही जागरूक राहूया आणि इतरांनाही जागरूक करूया!



# भीती, संकोच दूर करत, उमेद देणारा एक प्रवास

प्रदीप चंद्रभान शेंडे

2005 साल... यवतमाळ जिल्ह्यात ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट संस्थेनं पाथ फाइन्डर इंटरनॅशनल व महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई यांच्या मदतीनं एचआयव्ही / एड्स जनजागृती मोहीम सुरू केली. या संसर्गाचा सर्वाधिक धोका असलेले समूह म्हणजे समलैंगिक पुरुष (एमएसएम), ट्रान्सजेंडर (टीजी), शरीरविक्री करणाऱ्या महिला आणि स्थलांतरित लोक.

समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या या जनसमुहांसाठी ही एक नवीन सुरुवात असणार होती. पण एक मोठं आव्हानही होतं, ते म्हणजे या समुदायांपर्यंत पोहोचायचं कसं? लोक घाबरत होते, आपली ओळख उघड करत नव्हते, समाज नाकारेल या भीतीने कोणीच पुढं येत नव्हते.

संस्थेचे कार्यकर्ते वेगवेगळ्या ठिकाणी जायचे. लोकांशी बोलायचे. एका संध्याकाळी, पाच-सात जणांना संस्थेच्या ऑफिसमध्ये बोलावण्यात आलं. ‘आम्ही तुमच्या मदतीसाठी काम करणार आहोत,’ हा विश्वास दिला. पहिल्यांदा एका एमएसएम व्यक्तीनं आपल्या मनातील भीती बोलून दाखवली, “आमची ओळख उघड झाली तर लोक बोलतील... आम्हाला घर सोडायला लागेल... पोलिसांकडून त्रास होईल...” पण संस्थेनं विश्वासाचं नातं तयार केलं. हळूहळू लोक जुळू लागले, सहभाग वाढू लागला. पहिल्यांदा काहीजण आरोग्य तपासणीसाठी पुढे आले, मग आणखी काही जण...आणि या प्रकारे एक मोहीम सुरू झाली.

संस्थेच्या मदतीनं समलैंगिक पुरुष आणि ट्रान्सजेंडर व्यक्तींना आरोग्य तपासणी, समुपदेशन आणि सामाजिक योजनांची माहिती देण्यात आली. आपल्यालाही अधिकार आहेत, याची जाणीव त्यांची उमेद वाढवणारी होती. जसं जसं मोहिमेचा विस्तार झाला, तसंतसं जास्त लोक जुळले. 2005 मध्ये 300 एमएसएम लोक सहभागी होते, आज 2000 हून अधिक झाले आहेत.

समाजाने स्वीकारलं पाहिजे, पोलिसांनी अत्याचार करता कामा नये, ही त्यांची मागणी रास्त होती. संस्थेनं पोलिसांसोबत बैठका घेतल्या. पारलिंगी (ट्रान्सजेंडर) व्यक्तींच्या अन्यायाला वाचा फोडली. त्यांच्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न करण्यात आला. हळूहळू समाजाचा दृष्टीकोन बदलू लागला.

आता या समुहांनी स्वतःसाठी स्वतः उभं राहण्याची वेळ आली. ‘स्वतःला स्वीकारा, स्वतःसाठी उभं राहा!’ 2012 मध्ये, एमएसएम समुदायातील काही लोकांना एकत्र आणून “नवचेतना विकास संस्था” स्थापन केली. त्यांचं म्हणणं होतं की, ‘आम्हाला दयामाया नकोय, रोजगार हवाय!’ यवतमाळमध्ये

32 ट्रान्सजेंडर व्यक्ती अधिकृत नोंदणीकृत आहेत. आज या समुदायांना सामाजिक योजनांचा लाभ मिळतोय, रोजगार मिळतोय.

जे लोक लपून राहत होते, भीतीत जगत होते, तेच लोक आत्मविश्वासाने समाजासमोर उभे आहेत. “आम्ही आमच्यासाठी उभे आहोत!” ही भावना आत्मविश्वास वाढवणारी आहे. मात्र हा प्रवास अजून सुरूच आहे... त्यांचा स्वतःचा शोध, समाजाचा स्वीकार आणि आत्मनिर्भरतेचा लढा अजून चालूच आहे.

# शेतीला दिली बकरीपालनाची साथ

रावभान शंकर मडावी

मी रावभान शंकर मडावी. यवतमाळ जिल्ह्यातल्या झरी जामणी तालुक्यातील दाभाडी हे माझं गाव. माझा मुख्य व्यवसाय शेती असून माझ्याकडे तीन एकर जमीन आहे. शेतीला मजुरीची जोड देऊन आम्ही कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. पण जगण्याचा संघर्ष काही संपत नाही. पूर्वी कसंबसं भागायचं, पण आता भागत नाही. घरखर्च आणि मुलांच्या शिक्षणाचा खर्च वाढतोय. नवीन काहीतरी करायला पाहिजे असं वाटायचं.

गावात 'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट' संस्थेचे विविध उपक्रम चालतात. संस्थेची लोकं शासनाच्या योजनांची माहिती देतात. मीही उत्सुकतेने माहिती घेतली. बकरीपालन हा एक चांगला जोडव्यवसाय असू शकतो, हे लक्षात आलं. यामुळे घराला अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत मिळू शकतो.

संस्थेच्या मार्गदर्शनाखाली 2021 मध्ये पशुसंवर्धन विभागाच्या जिल्हास्तरीय पशुपालन योजनेत अर्ज केला. दोन-तीन महिन्यांनी फोनवर मेसेज आला की माझी निवड झाली आहे. मी मेसेज संस्थेच्या प्रतिनिधींना दाखवला. त्यांच्यासोबत सर्व कागदपत्रं अपलोड केली. त्यानंतर वेळोवेळी पशुसंवर्धन विभागात जाऊन कागदपत्रं तपासणी आणि प्रक्रिया पूर्ण केली.

योजनेत 10% लाभार्थीचा वाटा भरावा लागणार होता, जो बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे जमा करायचा होता. सर्व औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर पशुसंवर्धन विभागाच्या एलडीओ सरांनी सांगितले की, बकऱ्या अमरावतीहून आणाव्या लागतील. गावापासून तब्बल 100 किलोमीटर अंतरावरून बकऱ्या आणणं खूप अवघड वाटत होतं. बाहेर गावाहून आणलेल्या बकऱ्या स्थानिक हवामानाशी जुळवून घेऊ शकतील का? जिवंत टिकतील का? या शंकेमुळे मी योजना घेण्याचा विचार सोडून दिला.

पण संस्थेच्या प्रतिनिधींनी समजावलं, धीर दिला आणि मी पुन्हा योजना घेण्यास तयार झालो. दुसऱ्याच दिवशी अमरावतीला जाऊन 6 बकऱ्या आणि 1 बोकड घेऊन आलो.

संस्थेच्या मार्गदर्शनानुसार योग्य देखभाल, आहार, औषधोपचार आणि व्यवस्थापन शिकून घेतलं. ही योजना रू. 72,000 च्या अनुदानावर होती आणि मला पूर्ण लाभ मिळाला.

आज त्या सहा बकऱ्यांपासून 7 पिल्लं झाली आहेत. आता बकरीपालन माझ्यासाठी शेतीसोबत एक चांगला उत्पन्नाचा पर्याय ठरला आहे. कुटुंबाच्या उपजीविकेत लक्षणीय सुधारणा झाली आहे.

संस्थेच्या विश्वासाने मी बकरीपालनाचा निर्णय घेतला, त्यातून आत्मविश्वास वाढला आणि आर्थिक स्थिरता मिळाली. यासाठी संस्थेचे आभार मानावे तेव्हढे कमीच!

# शकुंतलाताईंची नैसर्गिक शेती

समाधान कव्हर

अमरावती जिल्ह्यातल्या धारणी तालुक्यातील गवलांडोह हे गाव. या गावातल्या शकुंतलाताईंची केवळ स्वतः नैसर्गिक शेतीकडे वळल्या नाहीत, तर इतर शेतकऱ्यांनाही त्यांनी त्यासाठी प्रेरित केलं. त्यांचीच ही गोष्ट.

शकुंतला किशोर दांडे आपल्या कुटुंबासोबत गवलांडोह गावात राहतात. त्यांच्याकडे 5 एकर शेती आहे. पहिल्यापासून त्या रासायनिक शेती करत आल्या आहेत. मात्र त्याचा खर्च दिवसेंदिवस वाढत चालला आहे. शिवाय जमिनीची सुपीकता कमी होत चालली आहे.

2021 पासून समाज प्रगती सहयोग संस्था गवलांडोह गावात नृसर्गिक शेतीविषयी जनजागृतीचे काम करत आहे. संस्थेचे प्रतिनिधी पंकज सावलकर गावातल्या शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचं महत्त्व समजावून देतात. रासायनिक शेती सोडून नैसर्गिक शेती करण्यास प्रवृत्त करतात.

शकुंतलाताईंनी त्यांना गावात खूपदा पाहिलं. गावात सगळे त्यांच्या कामाची चर्चा करायचे. ते समजल्यावर आपणही त्यांना भेटावं असं ताईंना वाटलं. शकुंतलाताईंना पुढच्या बैठकीला सहभागी व्हा, असं सांगण्यात आलं.

त्या बैठकीला गेल्या आणि त्यांनी पंकजभाऊंशी संवाद साधला. शेतीशी संबंधित आपल्या समस्या मांडल्या. संस्थेनं त्यांना शेतकरी गटात सहभागी व्हा, असं सांगितलं. शकुंतलाताई शेतकरी गटात सहभागी होऊन नैसर्गिक शेतीचे धडे गिरवू लागल्या. या प्रशिक्षणात त्यांनी बीज प्रक्रिया, अंकुरण, पीक फेरपालट, मिश्र पीक, तसेच दोन ते तीन पिके एकत्र घेण्याचे फायदे या गोष्टींची माहिती समजून घेतली. खरीप हंगाम सुरू होण्याच्या तोंडावर प्रशिक्षण मिळाल्यामुळे शकुंतलाताईंना खूप फायदा झाला. नव्या ज्ञानाचा लगेचच वापर करण्याचे त्यांनी ठरवले.

त्या वर्षी शकुंतलाताईंनी मका, तूर आणि कापूस यांचं मिश्र पीक घेतले. तुरीच्या ट्रायकोडर्मा आणि रायझोबियम वापरून बीजप्रक्रिया केली, ज्यामुळे रोगनियंत्रण साधले. पण त्या वर्षी जास्त पाऊस झाला. कापसाचं नुकसान झालं. कापसावर रसशोषक किडींचा प्रादुर्भाव वाढला. ते पाहून शकुंतलाताई नाराज झाल्या, पण त्याचवेळी तूर आणि मका मात्र सुस्थितीत होते. त्यांना मिश्र पीकाचं महत्त्व स्वानुभवातून समजलं. एक पीक खराब झालं तरी दुसऱ्या पिकाचा आधार मिळतो. शेतकऱ्याचे हात रिते राहात नाहीत.

पुढच्या बैठकीत पंकजभाऊंनी फळधारणा वाढवण्यासाठी काय करायचं, तुरीची तोडणी कशी करायची ही माहिती दिली. त्यानुसार शकुंतलाताईंनी स्वतःच घरी पाच पानांचा अर्क तयार केला. तो मका आणि तुरीच्या पिकांवर फवारला. याचा सकारात्मक परिणाम दिसला. तुरीच्या झाडांना अधिक फांद्या फुटल्या आणि उत्पादन वाढलं.

त्यावर्षी त्यांनी बाजारातून रासायनिक औषधं आणलीच नाहीत. दरवर्षी 4000 रूपयांपर्यंत होणारा खर्च वाचला, बचत झाली. शिवाय मक्याचे 15 क्विंटल उत्पादन आलं, तर तुरीचं 5 क्विंटल. यामुळे कमी खर्चात चांगले उत्पन्न मिळाले आणि नैसर्गिक शेतीच्या प्रभावावर त्यांचा विश्वास बसला.

रबी हंगामातही त्यांनी ट्रायकोडर्मा आणि रायझोबियमने बीजप्रक्रिया केली. त्यामुळे चण्याच्या पिकावर कोणताही रोग झाला नाही. संस्थेच्या माध्यमातून भाजी लागवडीची माहिती घेत त्यांनी आपल्या शेतातल्या लहानशा भागात भाजीपाला घ्यायला सुरुवात केली. त्या घरापुरतं पिकवतात. आता ताज्या आणि विषमुक्त भाज्या घरच्या आहारात सामील झाल्या.

नैसर्गिक शेतीचं महत्त्व पटलेल्या शकुंतलाताई आवडीनं शेती करतात. काही अडचणी आल्या तर 'समाज प्रगती सहयोग' च्या तज्ज्ञांशी सल्लामसलत करतात. शिकलेल्या गोष्टी तितक्याच जोमानं अंमलात आणतात. याशिवाय, त्या गावातल्या इतर शेतकऱ्यांनाही नैसर्गिक शेती करण्यासाठी प्रेरित करतात.

# बाई झाली सरपंच, सुधारला गावाचा प्रपंच

पुजा विनोद कोवे

मी पूजा विनोद कोवे. केळापूर तालुक्यातल्या अर्ली या छोट्याशा आदिवासी गावात एका शेतमजूर कुटुंबात माझा जन्म 12 ऑक्टोबर 1996 रोजी झाला. माझी आई निर्मला विनोद कोवे. आम्हा तिन्ही भावंडांचे शिक्षण तिनं मोठ्या जिद्दीने पूर्ण केले. वडील नसतानाही आईनं शेतमजुरी करून कुटुंबाचा गाडा चालवला.

मी गावातच सातवीपर्यंतचं शिक्षण पूर्ण केलं. आठवीपासून बारावीपर्यंतचं शिक्षण घाटंजीच्या शासकीय कन्या आश्रमशाळेत पूर्ण झालं. त्यानंतर यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून बीए. पूर्ण केलं. शिक्षण घेता घेताच आईला तिच्या कामात मदत करू लागले.

गावातल्या लोकांच्या समस्या मला जमेल त्या रितीने सोडवण्याची मला आवड होती. माझ्या मनात नेहमीच विचार यायचे की 'आपल्या समाजाचा विकास कसा होईल?' 'आपल्याला पुढे नेणाऱ्या संधी कशा मिळतील?' याच विचारांतून माझ्यात समाजसेवेची आवड निर्माण झाली. गावाच्या हितासाठी आपण काहीतरी करायला पाहिजे अशी तळमळ वाटू लागळी.

2018 मध्ये ग्रामपंचायत निवडणुकीत सरपंच पद आदिवासी महिलेसाठी आरक्षित होतं. गावातल्यांनी माझ्यावर विश्वास दाखवून निवडणूक लढवण्यास प्रोत्साहित केलं. मीही तयार झाले. त्या एका घटनेनं माझ्या जीवनाला वेगळं वळण दिलं. गावाच्या विकासासाठी काम करण्याची संधी मला मिळणार होती. निवडणुकीत जोरदार स्पर्धा होती. विरोधी पक्षही होता, पण गावकऱ्यांनी मला मोठ्या मताधिक्याने निवडून दिलं. 5 जून 2018 रोजी, वयाच्या अवघ्या 22 व्या वर्षी, मी सरपंचपदाची शपथ घेतली.

गावाच्या विकासाची जबाबदारी स्वीकारून मी कामाला लागले. आमच्या बॉडीनं अनेक कामं केली. मुलांना आधुनिक शिक्षण मिळावं यासाठी गावातली शाळा डिजिटल बनवली, अंगणवाडी म्हणजे लहान मुलांची पहिली शाळा. तिच्यात सुधारणा केली. गावात नवीन रस्ते केले आणि घरकुल योजना राबवल्या. शिक्षणाची गरज आणि महत्त्व प्रत्येकाच्या मनात बिंबवण्याचा प्रयत्न केला.

5 जून 2023 ला माझा सरपंचपदाचा कार्यकाळ संपला. पण अजूनही समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द मनात होती. याच सुमाराला 'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट'च्या युथ फेलोशिपची माहिती मिळाली. मी फॉर्म भरला आणि मला मुलाखतीसाठी बोलावण्यात आलं. मुलाखत चांगली पार पडली. आणि मला समाजसेवेची आणखी मोठी संधी मिळाली!

संस्थेनं माझ्यावर 5 गावांची जबाबदारी सोपवली. त्यात एक माझं गावही होतं. या पाचही गावात सामूहिक वनहक्क पट्टा मंजूर झालेला. गावकऱ्यांनी कायद्याची माहिती देऊन सुधारणा घडवून आणायचं हे काम आहे. माझ्या स्वतःच्या गावाला 171 हेक्टर 10 आर जमीन मिळाली आहे. वनहक्क कायद्याची माहिती देण्यापासून ग्रामसभांमार्फत योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यापर्यंत अनेक कामं आता वेगाने सुरू झाली आहेत. गावकऱ्यांनी पुन्हा एकदा माझ्यावर विश्वास दाखवला आहे, त्यांचे मला सहकार्य आहे. गावाच्या विकासासाठी ही नवी जबाबदारी पार पाडण्यासाठी मीही सज्ज खाले आहे.

# गोष्ट सामूहिक वनहक्कांची, आदिवासींच्या एकजुटीची

राहुल चिचघाटे

विठ्ठलवाडी हे केळापूर तालुक्यातलं एक पुनर्वसित गाव आहे. धरण प्रकल्पामुळे वागदा इथले काही लोक विस्थापित होऊन इथे आले होते. गेल्या 35 वर्षांपासून पुनर्वसित या गावात अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती आणि इतर समाजाचे लोक राहतात.

2022 मध्ये पुण्यातील आदिवासी संशोधन केंद्रा मार्फत माहिती संकलनाचे काम करताना प्रथम मला या गावाची माहिती झाली. गावाची पाहणी केली. गावाची सरपंच कोलाम समाजातील महिला असल्याचं लक्षात आलं.

तलावाच्या काठावर वसलेले निसर्गरम्य गाव, पण गावात एकता नव्हती.

गावात राजकीय मतभेद आणि गटबाजीमुळे तणाव होते. ग्रामपंचायत निवडणुकीमुळे गाव दोन गटांत विभागले गेले, असं लोकांनी सांगितलं. माहिती संकलनाचं काम पूर्ण झाल्यानंतर काही दिवसांनी 'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट' कार्यालयातून फोन आला - "युथ फेलोशिपसाठी तुमची मुलाखत होणार आहे." मी 8 जून 2023 ला संस्थेच्या कार्यालयात मुलाखतीसाठी गेलो. 750 अर्जांमधून 40 युथ फेलोची निवड झाली. मी त्यात एक होतो!

संस्थेने माझ्यावर 5 गावांची जबाबदारी सोपवली, त्यातील एक गाव विठ्ठलवाडी होते. मी 9 जून २०२३ला प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. गावच्या सरपंच शिलाताई कुंभेकर ओळखीच्या होत्या, त्यामुळे सुरुवात करणे सोपे गेले.

गावाला 493 हेक्टर सामूहिक वनहक्क क्षेत्र मंजूर झाले होते. ग्रामसभेत ग्रामस्थांना वनहक्क कायद्याची माहिती देण्याचं मी ठरवलं. ठरल्याप्रमाणे ग्रामसभा आयोजित झाली. पण खूप कमी लोकांनी प्रतिसाद दिला. त्यामुळे सभा तहकूब करावी लागली.

"तुमच्या गावाला सामूहिक वनहक्क मिळाला आहे, समिती तयार करावी लागेल." मी लोकांना सांगत होतो. गावकऱ्यांशी संवाद साधत होतो. पण कोणी विश्वास ठेवायला तयार नव्हतं. त्यांची भावना होती, "तुमच्यासारखे बरेच आले आणि गेले, लोकं आश्वासन देतात आणि निघून जातात. होत काहीच नाही." त्यांचा अनुभव बरोबर असेलही. मला तो बदलणं भाग होतं. मी प्रयत्न सोडले नाहीत. त्यांना वनहक्क कायद्याचा जीआर वाचून दाखवला, समजून सांगितला. पुढची ग्रामसभा महत्त्वाची आहे, त्याला सर्वांनी उपस्थित रहा, असं सांगितलं. यावेळी ग्रामसेवकांनी पुढाकार घेतला आणि नव्याने ग्रामसभा

आयोजित केली. ग्रामसभेत मी स्वतःचा आणि संस्थेचा परिचय करून दिला. प्रकल्पाची आणि वनहक्क कायद्याची सविस्तर माहिती ग्रामस्थांना समजावून दिली. कलम 3(1) क अंतर्गत सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती गठीत करावी लागेल, हेही समजावून सांगितले.

पूर्वी 11 लोकांची समिती होती, परंतु ती पुनर्गठित करून नव्याने समिती स्थापन करण्यात आली. गावातल्या आठवडी बाजाराच्या दिवशी म्हणजे प्रत्येक शुक्रवारी समितीची बैठक घेण्याचा निर्णय झाला. समितीने वनहक्क क्षेत्राच्या व्यवस्थापनावर आणि रोजगार निर्मितीवर विचार सुरू केला.

ग्रामसभांमध्ये गावातल्या सर्व लोकांना वनहक्क व्यवस्थापनाचे महत्त्व समजलं आणि कामाला गती मिळाली. गावकऱ्यांनी आता स्वतः पुढाकार घेऊन जंगल मोजणीसाठी अर्ज करायचं ठरवलं. या प्रक्रियेत आदिवासी समाजामध्ये एकजूट निर्माण झाली. गावातले सणगी सगळे एकत्र येऊन साजरे करू लागले.

सुरुवातीला असलेला तणाव, अविश्वास आणि गटबाजी इतिहासजमा झाली. लोकांमध्ये परस्पर विश्वास निर्माण झाला आणि वनहक्काचा उपयोग करण्यासाठी, स्वतःच्या आणि गावाच्या विकासासाठी, लोक एकत्र आले आहेत. वनहक्काच्या प्रवासातून विठ्ठलवाडी गावाच्या एकतेचा आणि विकासाचा मार्ग तयार झाला.

# संवेदनशीलतेने केलेला नशामुक्तीचा प्रयत्न

भक्ति पजगाडे

आपल्या देशात 6 कोटींहून अधिक लोक नशेच्या आहारी गेले आहेत अशी माहिती सामाजिक न्याय आणि अधिकार मंत्रालयाच्या राष्ट्रीय सर्वेक्षणात दिसून आली. मुख्य म्हणजे यांत 6 ते 6 वर्षे वयोगटातल्या मुलांची मोठी संख्या आहे.

नशेची समस्या वाढली आहे. नशा करणे हा स्टेटस सिम्बॉल किंवा हिरोगिरीची निशाणी असे तरूणाईला वाटते. फॅशन आणि खोट्या आधुनिकतेच्या समजुतींमुळे मुलगेच नव्हे तर मुलीही नशेच्या विळख्यात सापडताहेत. शहरांपासून लहान गावांपर्यंतची परिस्थिती चिंताजनक आहे.

असेच एक गाव भोसा. यवतमाळ जिल्ह्यातल्या भोसा गावातल्या जिल्हा परिषद शाळेत 6 विद्यार्थी शिकतात. पण मोठ्यांचं अनुकरण करत काही मुलं नशेच्या आहारी गेली.

ही बाब जेव्हा शाळेच्या शिक्षिकेच्या लक्षात आली. तिनं मुलांना समजावण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु, नुसतं समजाऊन काहीच बदल झाला नाही. त्या न कळत्या वयातल्या मुलांना पटवून देणं अवघड असलं तरी ते आवश्यक होतं. ही समस्या सोडवण्यासाठी, 'ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट'नं वेगळ्या पद्धतीचा अवलंब करायचा निर्णय घेतला.

संस्थेनं आधी मुलांच्या समस्या समजून घेण्याचा प्रयत्न केला. शाळेच्या शिक्षिकेकडून संपूर्ण माहिती घेतली. ग्राम बाल संरक्षण समितीची बैठक घेऊन त्यात या समस्येवर चर्चा घडवून आणली. ग्रामस्थांनी आणि समितीच्या सदस्यांनी या विषयाची गंभीरता ओळखून संस्थेला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

मुलांना थेट नशाबंदीबाबत सांगून काहीच उपयोग होणार नाही, हे संस्थेचे कार्यकर्ते जाणून होते. त्यांनी वेगवेगळे खेळ, गाणी आणि कृतींच्या माध्यमातून नशेच्या दुष्परिणामांवर चर्चा घडवून आणली. नशेच्या विळख्याने लोकांचे जीवन कसे उद्ध्वस्त होते, याचे गोष्टीरूप व्हिडिओ दाखवले. नशामुक्तीबाबत पोस्टर तयार करून गावभर लावण्याचे काम मुलांवर सोपवले. या प्रक्रियेमध्ये शिक्षक, अंगणवाडी सेविका आणि काही विद्यार्थीही उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

या शालेय प्रक्रियेच्या जोडीने गावातील सरपंच आणि प्रतिष्ठित व्यक्तींनीही काही गोष्टी एकमताने ठरवल्या. ग्रामसभेमध्ये निर्णय झाले की, कोणत्याही दुकानात मुलांना तंबाखूजन्य पदार्थ किंवा नशेच्या वस्तू विक्री केली जाणार नाही. दुकानदारांना तशी कायदेशीर नियमांची माहिती देण्यात आली. कायद्याच्या कलमांनुसार, असे पदार्थ विकल्यास दंड आणि कायदेशीर कारवाई होईल, हेही स्पष्ट करण्यात आले.

चार दिवसांच्या आत, गावातील सर्व दुकानांमध्ये या नियमांचे पत्रक वितरित करण्यात आले आणि प्रत्येक दुकानमालकाचे सही घेतली गेली. हे संपूर्ण काम कायदेशीर मार्गाने पार पाडले गेले.

कालांतराने हळूहळू बदल दिसू लागला. आज भोसा गावातली मुले नशेपासून दूर आहेत. मुलांनी स्वतःहून इतर मुलांना नशापासून दूर राहण्याची प्रेरणा द्यायला सुरुवात केली आहे.

# विषमुक्त जमीन, सत्वयुक्त अन्न

अनिल सेलुकार

अमरावतीतल्या धारणी तालुक्यातील मेळघाट परिसरातील झापल या आदिवासी गावातल्या महिला शेतकरी रामकुबाई भगवंतदास कसदेकर या महिला शेतकरी. आजकाल त्या चिंतेत असायच्या. कितीही खतं टाकली तरी उत्पादन घटत होतं. रासायनिक खतांचा खर्च, उत्पन्न कमी आणि जमिनीचा खालावत चाललेला पोत. पण ही एकट्या रामकुबाईंची समस्या नव्हती. सगळ्या गावाची होती.

या समस्येवर मात करण्याचा मार्ग गावकऱ्यांना 2018 मध्ये सापडला. त्या वर्षी 'समाज प्रगती सहयोग' (SPS) संस्थेनं गावात प्रदर्शन आयोजित केलं. त्यातून नैसर्गिक शेती आणि रसायन-मुक्त शेतीचं महत्त्व लोकांना समजाऊन सांगितलं. गावातल्या जवळपास 80 महिला आणि 60 पुरुष यात सहभागी झाले.

त्यानंतर संस्थेच्या कार्यकर्त्यांनी 17 महिलांचा 'महिला किसान गट' तयार केला. या गटाच्या शेती दौऱ्यादरम्यान रामकुबाईंची ओळख संस्थेच्या कार्यकर्त्यांशी झाली. त्यांनी आपल्या अडचणी सविस्तरपणे मांडल्या, "मी अनेक वर्षांपासून रासायनिक शेती करतेय, पण आता उत्पादन कमी होतंय आणि खर्चही वाढतोय..." संस्थेनं 'विष-मुक्त शेती' संकल्पनेची माहिती दिली आणि नैसर्गिक शेतीचा मार्ग दाखवला.

रामकुबाईंकडे दोन एकर शेती आहे. पहिल्या वर्षी त्यांनी एक एकरामध्ये नैसर्गिक शेती करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी भूनाडेप, जैविक खत, बीज प्रक्रिया, बीज अंकुरण, जैविक औषधे आणि 'पाच पानांचा काढा' यासारख्या पद्धती शिकून घेतल्या आणि वापरल्या. पहिल्या वर्षी त्यांना अपेक्षित उत्पादन मिळाले नाही, पण दुसऱ्या वर्षी उत्पादनात 50% वाढ झाली.

पूर्वी 1 एकरात 8-9 क्विंटल कपाशीचे उत्पादन होत होते, पण नैसर्गिक पद्धतीने ते 16-17 क्विंटलपर्यंत वाढले. रासायनिक शेतीत 15,000 ते 20,000 रुपये खर्च होत होता, पण जैविक शेतीमुळे तो केवळ 2,000 ते 3,000 रुपयांवर आला. कमी खर्चात अधिक उत्पादन!

आणखीही फायदे रामकुबाईंच्या लक्षात आले. "जैविक शेतीमुळे जमीन तर सुपीक झालीच, माझंही आरोग्य सुधारलं." रासायनिक शेतीच्या दुष्परिणामांपासून मुक्त होण्याकडे त्यांची वाटचाल सुरू झाली. नैसर्गिक शेतीचं महत्त्व पटलेल्या रामकुबाई आता इतर शेतकऱ्यांना प्रेरणा देतात. त्यांनाही जैविक शेतीसाठी प्रवृत्त करतात.

# नागलीचे पुनरुज्जीवन: पीक जुने, पद्धती नवी

संगिता जाधव

शांताराम लक्ष्मण चौधरी हे पालघर जिल्ह्यातल्या मोखाडा तालुक्यातील सड़कवाडी गावातले शेतकरी. या भागात वारली, महादेव कोळी आणि कातकरी हे आदिवासी समुदाय राहतात. डोंगराळ आणि खडकाळ भूभाग असल्यामुळे इथे शेतीची आव्हाने मोठी आहेत. भरपूर पाऊस पडत असला तरीही मुरमाड माती पाणी धरून ठेवू शकत नाही, त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा कायम तुटवडा जाणवतो.

गावातील बहुतांश लोक पावसाच्या पाण्यावर अवलंबून शेती करतात. खरीप हंगामात भात, वरई, नागली आणि उडीद या पिकांची लागवड केली जाते. नागली हे आदिवासी समुदायाचे पारंपरिक पीक. नागलीची भाकरी हाच त्यांचा आहार. त्यांच्या कष्टाच्या जीवनशैलीसाठी नागलीसारखे पोषक धान्य दुसरे नाही. पण नागलीचे उत्पादन हळूहळू घटू लागले. नागलीवर कीड आणि रोगांचे प्रमाण वाढलं, त्यामुळे शेतकरी तिची लागवड टाळू लागले.

शांतारामसारख्या शेतकऱ्यांना नागलीची लागवड करायची होती. पण कमी होत चाललेल्या उत्पादनामुळं शेतकरी नाराज होते. या समस्येतून मार्ग काढण्याची गरज त्यांना भासत होती. याच सुमारास प्रगती अभियान संस्थेने आदिवासी शेतकऱ्यांना ओडिशाच्या 'मिलेट मिशन'कडून नवीन तंत्र शिकण्याची संधी दिली. नाशिक, पालघर आणि ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांसोबत नागली शेतीतील आधुनिक पद्धतींचा प्रयोग करण्यास सुरुवात झाली.

खर्च न वाढवता उत्पादन वाढवण्याची ही पद्धती होती. यात काही विशिष्ट पद्धतींचा समावेश होता. जसे की बीजप्रक्रिया, गादीवाफे पद्धत, जीवामृत आणि मटकाखत इत्यादी. शांताराम यांनी संस्थेच्या प्रशिक्षणात भाग घेतला. नवीन पद्धती आत्मसात केल्या आणि आपल्या शेतात प्रयोग सुरू केले. त्यांनी केवळ स्वतःच्या शेतातच बदल केले नाहीत, तर इतर शेतकऱ्यांनाही हे तंत्रज्ञान अवलंबण्यासाठी प्रेरित केले.

"पूर्वी नागलीच्या लागवडीसाठी मोठ्या कष्टांची गरज होती, मात्र गादीवाफा तंत्राने पेरणी प्रक्रिया सोपी झाली. पूर्वी रोपं एकत्र लावली जात होती, त्यामुळे कीड आणि रोग वाढायचे. पण आता आम्ही योग्य अंतरावर रोप लावतो, त्यामुळे हवा खेळती राहते आणि कीडही लागत नाही," शांताराम सगळ्या पद्धती सोप्या भाषेत शेतकऱ्यांना समजाऊन देतात.

त्यांच्या उत्पादनातही लक्षणीय फरक पडला. 2021 मध्ये एक एकरात 250 किलो नागलीचे उत्पादन होते. 2022 मध्ये 500 किलो, तर 2023-24 मध्ये 600 किलोपर्यंत उत्पादन वाढले!

शांताराम आनंदाने सांगतात, "नवीन तंत्रज्ञानामुळे भरघोस नागली पीक मिळालं. आता आम्ही स्वतः नागली रोज खातो आणि इतरांनाही खायला देतो." घरातल्या आहारात नागलीचा समावेश वाढला, तसेच अंगणवाडीत नागलीचा खाऊ देता येऊ लागला. नागलीपासून लाडू, बर्फी आणि थालीपीठ यांसारखे नवीन पदार्थ तयार केले जात आहेत, जे मुलांसाठी पोषणमूल्यांनी समृद्ध आहेत आणि कुपोषण कमी करण्यात मदत करत आहेत.

नवीन प्रयोग, आधुनिक तंत्र आणि पारंपरिक शेती यांचं मिलाप घडवून शांताराम चौधरींसारखे शेतलरी आदिवासींच्या पारंपरिक पीकाचे पुनरुज्जीवन करताहेत. त्यांची नागली शेती नव्याने बहरत आहे.

७६६६७२१४०९

# निकमवाडीच्या मेहनती गावकऱ्यांनी तयार केला रस्ता

संगिता जाधव

निकमवाडी हे पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात वसलेले एक छोटं आदिवासी गाव. साधारण 150-200 लोकवस्ती. शेती आणि मजुरी बरोबरच वनोपज संकलन हा इथल्या लोकांच्या उपजीविकेचा एक महत्त्वाचा भाग. बांबू, मध, तेंदूपत्ते आणि इतर वनोपज गोळा करून ते बाजारात विकतात. मात्र, घनदाट जंगल आणि कच्च्या रस्त्यांमुळे वनोपज गोळा करण्यासाठी जाणे आणि वाहून गावात आणणे त्यांच्यासाठी दिवसेंदिवस कठीण होत चालले होते.

ही समस्या सोडवण्याचा मार्ग रोजगार हमीतून म्हणजेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्यातून (मनरेगा) मिळाला. एप्रिल 2019 मध्ये 'प्रगती अभियान'नं मोखाडा तालुक्यात मनरेगा प्रशिक्षण आयोजित केलं. गावातले तरुण मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले. या प्रशिक्षणातून त्यांना गाव आराखडा, शेल्फ, कामाची मागणी करण्याची प्रक्रिया अशा गोष्टी नीटपणे समजून घेता आल्या. मनरेगातून मिळणाऱ्या लाभांविषयी माहिती मिळाली. मनरेगातून स्थानिक संसाधनांचा विकास झाला की शेतीचं उत्पन्नही वाढतं हेही गावकऱ्यांना समजून आलं.

निकमवाडीचे दोन युवक संजय पाटील आणि तुकाराम पाटील. त्यांनी पुढाकार केला आणि कामाची मागणी करण्यात आली. पहिल्यांदाच काम मागणी होत होती. ती मंजूर झाली. पण केवळ 22-23 मजुरांना काम मिळालं. तरी नाराज न होता पुन्हा पुढच्या वर्षी, 2020-21 मध्ये, त्यांनी अधिक तयारीनं मागणी केली. शेतकऱ्यांनी विविध कामांच्या सूचना केल्या होत्या, ज्यात सर्वात महत्त्वाचे होते शेतांपर्यंत आणि जंगलांपर्यंत जाणारा रस्ता तयार करणे. हे लक्षात घेऊन काम मागणीत समाविष्ट केले.

2022 मध्ये त्यांची मागणी मंजूर झाली. काम सुरू झाले. 145 मजुरांना जवळपास 40 काम मिळाले. सुरुवातीला मजुरीचा दर दररोज रुपये 221 पडला. पण संस्थेनं प्रत्यक्ष गावात जाऊन लोकांशी चर्चा केली. 10-10 मजुरांचे गट तयार केले. नियोजनपूर्वक काम केल्यानं जास्त काम झालं आणि मजुरी वाढली. या प्रशिक्षणानंतर मजुरी दर रुपये 245 प्रतिदिन मिळाला. या कामामुळे सर्वांना आर्थिक आधार मिळाला. शिवाय शेतांपर्यंत आणि जंगलांपर्यंत पोहोचण्याचा मार्ग सुकर झाला.

मनरेगातून गावातल्या मजुरांनी केलेला हा रस्ता, ज्यामुळे जंगलापर्यंत जा-ये करणे सोपं झालं. ज्यामुळे वनोपज बाजारात विकण्याचा आणि आर्थिक लाभ मिळवण्याचा मार्ग खुला झाला. ही रोजगार हमी योजनेची एक शाश्वत उपलब्धी. आता या रस्त्याचे डांबरीकरणही झाले आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांचा पर्यायी रोजगार मजबूत झाला आणि वाहतूक सुरळीत होण्यासही मदत झाली.

निकमवाडीच्या कष्टकरी मजुरींना मेहनतीच्या जोरावर विकासाचा नवा मार्ग तयार केला. 'रोजगार हमी योजना अत्यंत फायदेशीर आहे, कारण यातून दीर्घकालीन आणि शाश्वत विकासकामे होतात,' हे आता गावकऱ्यांना समजले आहे.

7666721409




Address : A-5, Aykar Colony, G-3, Gulmohar Bawadiya Kalan, Bhopal, Madhya Pradesh.

Contact : 0755 4252789

Email : office@vssmp.org
vikassamvad@gmail.com

website : www.vssmp.org


VIKAS SAMVAD